वर्ष: ७ वे

अंक: ७ वा

जुलै २०२२

किंमत: ४० रूपये


मासिक

# शिक्षणयात्री



तस्मे श्री गुरुवे नमः

# वारी एक शिक्षकाची

नाही पंढरीशी जाणे, नाही केली कधी वारी।
माझी कर्मभूमी हीच, माझी रोजची पंढरी ॥

माझा खडू-फळा माझे, टाळ, विणा नी मृदंग।
फुले ज्ञानाची घेऊन, रोज रंगतो अभंग ॥

मन मोकळे कराया, जेव्हा येतात लेकरं ।
त्यांच्या डोळ्यातलं पाणी, माझं चंद्रभागा तीर॥

त्यांचे दुःख निवारून, देतो दान आनंदाचे।
काही वेगळे आहे का, पुण्य देव दर्शनाचे ॥

ज्ञानदानाचे हे व्रत, हीच माझी एकादशी।
माझे लेकरांचे यश, माझे प्रयाग नी काशी ॥

जेव्हा येतात लेकरं, सुख-दुःख वाटायला।
त्यांच्या रूपाने विठ्ठल, रोज येतो भेटायला ॥



सुलेखन: एकनाथ गाइकवाड

# अंतरंग


**तस्मे श्री गुरुवे नम:**
.प्रभाकरराव चव्हाण/३

**तस्मे श्री गुरुवे नम:**
सचिन पाटील/५

**तस्मे श्री गुरुवे नम:**
अंजली देशपांडे/७

**तस्मे श्री गुरुवे नम:**
किरण दशमुखे/९

**तस्मे श्री गुरुवे नम:**
सीमा मोडक/११

**टेक्सास शाळेचा धडा**
डॉ.विजय पांढरीपांडे/१२

**पुस्तकांशी नाते जोडतांना**
युवराज माने/१४

**लांब मानेची जलचर कासवं**
डॉ.नंदा हरम/१७

**प्रवास प्राचार्य पदापर्यंतचा**
गोविंद गांगुर्डे/२०

**गुणवत्तेकडून शाळा विकासाकडे**
मैसनवाड पेंटू/२२



मार्गदर्शक
**मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)**

मानद संपादक
**सुभाषदादा कुलकर्णी**

उप संपादक
**संदेश नंदकिशोर हजारे**

संपादन सहाय्य
**डॉ.दिपक बाविस्कर**
**डॉ.युवराज पवार**

अंक जुळणी
**प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे**

मुद्रितशोधन
**डॉ.युवराज पवार**

मुखपृष्ठ
**साभार आंतरजाल**

कार्यालय प्रमुख
**जगदीश पाटील**

**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक
# शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ७ वे  अंक: ७ वा  जुलै २०२२

**वार्षिक:रू.४००/-**  **द्वैवार्षिक:रू.७००/-**  **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी – खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता–
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.–शिरपूर जि–धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

संवाद



*सुभाष कुलकर्णी*
*संपादक*

जो जो जयाचा घेतला गुण
तो तो मी गुरु केला जाण
गुरुस आले अपारपण
जग संपूर्ण गुरु दिसे...

या उक्तीप्रमाणे माणसाला आपल्या जीवनात कुणा ना कुणाकडून,काही ना काही नवीन शिकायला मिळते.जीवनात पहिले गरु आपले आई वडील.नेमके काय करावे काय करु नये याची शिकवण ते आपल्याला देत असतात. नंतर आपल्या शालेय जीवनात चार टप्यात आपले गुरु आपल्याला भेटतात,प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण,महाविद्यालयीन व त्यापुढील उच्च शिक्षण अशा चार टप्प्यात गुरु आपले जीवनमान,आपली शैक्षणिक,बौध्दीक पातळी उंचावत असतात.प्राथमिक शाळेत धडे शिकवणाऱ्या शिक्षकांना आजही आपण श्रध्देनं आठवतोय कारण आपले संस्कारक्षम बालमन त्यांनी घडवलेले असते.मुळात जीवन ही एक शाळाच आहे. त्या जीवनात अनेक माणसे आपल्याला भेटतात.आणि त्या प्रत्येकाकडून आपण काही ना काही गुण घेत असतो.ती सारी माणसे आपल्या गुरु स्थानी असतात.

अभ्यासातून,इतिहासाच्या पुस्तकातून आपण देशप्रेमाची जी प्रेरणा घेतो,ती प्रेरणा देणारे ग्रंथसुध्दा आपले गुरुच असतात.आपल्या कुंटूंबातील अगदी लहान मुले सुध्दा एखादे वेळी अशी गोष्ट बोलतात जी आपल्या जीवनाला मार्गदर्शक ठरु शकते.ती बालके सुध्दा आपले गुरुच असतात.त्यामुळे शाळेच्या चार भिंतीत गुरु शोधण्यापेक्षा उघड्या डोळ्याने उघड्या मनाने आपला आपल्या चहूबाजूला नजर टाकली तर सारे जगच आपल्याला गुरुच दिसते.नित्य रोज सकाळी उगवणारा सुर्य आपल्याला नियमितता शिकवतो,वृक्षवल्ली कशाचीही अपेक्षा न करता सावली,फळे देतात,निष्काम सेवा शिकवतात म्हणजे निसर्गसुध्दा आपला गुरुच आहे.

अशा जीवन समृध्द संस्कारक्षम करणाऱ्या प्रत्येकाला गुरुपौर्णिमानिमित्त कोटी कोटी प्रणाम.

# तस्मे श्री गुरुवे नमः

गुरुपोर्णिमा विशेष



प्रभाकरराव चव्हाण

शिरपूर-धुळे



आई जावत्राबाई

आयुष्यात भेटलेल्या प्रत्येकाला मी गुरुच्या रुपात पाहतो. प्रत्येकाकडून काहींना काही शिकण्या सारखे असते. त्याचेकडे जे चांगले आहे ते माझ्या पदरी घेण्याचा प्रयत्न नेहमीच राहतो.

या बरोबरच माझी कारकीर्द यशस्वी करण्यात आई, काकू, कुटूंब, मित्र, समाज या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे संस्कार, शिकवण या पाऊल वाटेवर मी चालत आलोय नि चालतोय !

आमची परिस्थिती जेमतेम होती. तीन/चार वर्षाचा असतानांच वडील देवाघरी गेले. नंतर प्रमुख असलेले काका सुध्दा वारले. माझा सांभाळ आई (जावत्राबाई) बरोबर आई समान असलेल्या काकू (वणूबाई महाजन) यांनी केला. दोघांचेही माझ्यावर संस्कार आहेत शिकवण आहे. भावी जीवनाची संस्कारी मुळं आईनेच माझ्यात रुजवली. खोटं बोलायच नाही, चोरी करायची नाही.कष्टाचंच खावं, कुणाचंही भांडण घरापावेतो आणु नको अशा छोट्या छोट्या शिकवणीतून माझी जडण-घडण होत गेली. आई नि काकू या माझ्यासाठी आज सुध्दा गुरुस्थानी आहेत.

घरची साधारण परिस्थिती असतांनाही माझं शिक्षण अकरावी (जुनी एसएससी) पर्यंत झाले. पहिली ते पाचवी नगरपालिकेच्या शाळेत (शाळा नं.२) येथे तर माध्यमिक शिक्षण पांडू बापू माळी म्यु.हायस्कुल शिरपूर येथे झाले. त्याकाळी असणाऱ्या शिक्षकांचा आजही अभिमान वाटतो.त्यांचं विषयावर असलेलं प्रभुत्व, शिकवण्याची तळमळ आजही आठवते. आमच्या माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक अ.ज्ञा.पुराणिक होते. कडक शिस्तीचा माणूस. त्याच सोबत एम.डी.कुलकर्णी, पी.डी.पाटील, पाध्ये सर, जी.एस.कुलकर्णी, आर.एम.अग्रवाल, अ.म.भावसार, जी.एस.पाटील, ऐंडाईत सर या शिक्षकांची आठवण आजही आहे. माझ्या आजच्या कारकिर्दीसाठी या शिक्षकांचंही योगदान महत्वाचे आहे. खऱ्या अर्थाने ते माझे गुरु होते.विषयाच्या ज्ञानाबरोबर जीवन जगण्याचे धडे त्यांचेकडून मला मिळाले. आणि हो..माझे मित्र सुध्दा माझ्यासाठी गुरुस्थानी आहेत. चांगले मित्र, चांगली संगत सोबत मिळाली तर आयुष्याचं सोनं होते अस म्हणतात. असच सोन्यासारखे मित्र मला लाभले. माझी आर्थिक परिस्थिती डळमळीत असतांना सुध्दा त्यांनी मला कधी अंतर दिले नाही. माझा मित्र परिवार दांडगा असला तरी त्यात कैलासचंद्र बन्सीलाल अग्रवाल, गोपाल किसनलाल भंडारी, राजगोपाल चंदुलाल भंडारी,सुभाषभाई जैन,डॉ.सतिष राठी, जतीन जयेशचंद्र जैन, ॲड.एस.आर.सोनवणे, अल्ताफ शेख (हिना कटपीस),सुभाष जैन यांचे संपर्कात आहे. मित्रांनी शालेय

जीवनात दिलेले प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सल्ले,चर्चा माझ्यासाठी शिकवणच होती. कैलासचंद्र अग्रवाल यांचेशी तर कौटूंबिक नाते जपलंय. माझ्या प्रत्येक सुख दु:खात कैलासचंद्र असतोच. शालेय जीवनात सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलनात माझा नेहमी सहभाग असायाचा. विशेषत: नाटकात भाग घ्यायचो. यावेळी वेशभुषेपासून इतर काही वस्तु लागे पावेतो सर्व मदत करायला कैलासचंद्र तयार असायचा. या माझ्या मित्रांनी जे माझ्यासाठी खूप केलंय आणि आजपावेतो ज्यांनीही सोबत केली ते माझे मित्रच झाले.आणि हे सर्व मित्र माझ्यासाठी गुरु आहेत.

माध्यमिक शिक्षणानंतर शिरपूरातील प्रसिध्द व्यापारी किसनलाल पन्नालाल भंडारी यांनी मला मुंबईला रेडियो टिव्ही दुरुस्ती शिक्षणासाठी फिलिप्स कंपनीत पाठवले. तेथुन आल्यानंतर मी हाच व्यवसाय सुरु केला. पुढे मित्र,माझा माळी समाज यांचे बळावर १९८५ साली नगरसेवक पदासाठी उमेदवारी केली आणि जिंकलो सुध्दा. तेव्हापासून आज पावेतो मी नगरसेवक म्हणून माझ्या प्रभागाचा नगरसेवक प्रतिनिधी म्हणुन कायम आहे. यात माझ्या समाजाचा खुप मोठा वाटा आहे.ज्या माळी समाजात माझा जन्म झाला. त्या समाजाने,त्या समाजातील आबालवृध्दांनी मला राजकिय पाऊल वाटेवर नेहमीच यशस्वी केले तो समाज माझ्यासाठी गुरुस्थानी आहे असे मी मानतो.

त्याचबरोबर राजकिय पटलावर माझे गुरु आदरणीय अमरिशभाई पटेल (मा.शालेय शिक्षण मंत्री) आहे. त्यांच्या प्रेरणेने माझा राजकीय प्रवास अबाधित राहिला. लोकहितासाठी झटण्याची शिकवण त्यांचेकडून मिळाली. १९८५ पासुन त्यांचे सोबत आहे. प्रत्येक कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्याचं कौशल्य त्यांचेकडून शिकण्यास मिळालं. स्व.मुकेशभाई पटेल यांचेकडून धाडसाची शिकवण मिळाली. संकटे आली तरी सुबह देखा जायेगा अब सो जावो असं म्हणणाऱ्या मुकेशभाईंनी भिती हा शब्द मनातून कायमचा काढून टाकायला मदत केली. अमरिशभाईंचे लहान बंधु भुपेशभाईंच्या जवळकीने मायेची ममता शिकवली. मृदु स्वभावाचे सुध्दा जग जिंकता येते याची प्रचिती आली. पटेल परिवाराशी कौटूंबिक नाते जुळले.अमरिशभाई स्व.मुकेशभाई, भुपेशभाई तीनही भाऊ माझ्यासाठी प्रेरणास्थान आहेत.

अमरिशभाईंच्या प्रेरणेने मला समाज विकासाची वाटचाल करणं सोपे झाले. नगरसेवक, नगराध्यक्ष, जिल्हा बँक संचालक, जिल्हा नियोजन मंडळ, रेल्वे बोर्ड,टेलिफोन बोर्ड, बहिणाबाई चौधरी विद्यापीठ (उमावि) येथे सिनेट सदस्य, मॅनेजमेंट कौन्सील मेंबर अशा विविध पदावर काम करण्याची संधी मिळाली. संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणक्षेत्रात अव्वल मानली जाणारी आर.सी.पटेल एज्यु.सोसायटी व ट्रस्ट यात सचिव म्हणून काम करण्याची प्रेरणा आदरणीय अमरिशभाईंनी प्रेरणा समाज विकासाच्या मार्गावर सतत चालत राहण्याचा ध्यास आ.अमरिशभाईंनी दिला.

माझ्या जीवनात येणाऱ्या,सोबत असणाऱ्या प्रत्येकाकडून जीवनाला आकार मिळाला.काही तरी शिकायला मिळले.प्रेरणा मिळाली,अशा सर्वांना नतमस्तक होऊन वंदन करतो.

– ९४२२२५५४७४

## तस्मे श्री गुरुवे नमः

गुरुपोर्णिमा विशेष



सचिन पाटील
शिरपूर-धुळे

### यू आर नॉट स्पेशल!

असा इकडे ये...आलास ! आता मुलांकडे तोंड करून उभा राहा !'सर सांगत होते आणि मी हसत हसत त्यांचे आदेश पाळत होतो.अचानक सप्पदिशी आवाज झाला. सर्वांग बधीर झाले. थोड्या वेळाने जाणीव परतली तेव्हा माझ्या निळ्या हाफ पॅन्टखालच्या पोटरीवर हिरवागार वळ उमटला होता. सरांच्या हातातली बांबूची छडी (आमच्या भाषेत शेमटी) अद्याप लपलप करीत होती. प्रचंड आगडोंब उसळलेला..पायावरचा वळ फारसा दुखत नव्हता. पण चिमुकल्या वयातला माझा चिमुरडा अहंकार मात्र ठसठसत होता. राहून राहून डोळे भरून येत होते. खुद्द माझ्यावर मार खाण्याची वेळ यावी ? हे बरं झालं नाही. अपनी इज्जत मिट्टी मे मिल गयी ! स्थळ-बनुमाय प्राथमिक विद्या मंदीर...वर्ग इयत्ता तिसरी...शिक्षक श्री प्रकाश पाटील सर...दुखावलेले पात्र अर्थातच मी...फटके खाण्याचे कारण- पाढे पाठ नसणे ! वडील मुख्याध्यापक असलेल्या शाळेत मी मार खावा या अपमानाने मी प्रचंड दुखावलो होतो. त्यापेक्षाही शिक्षकांनी मला मारले याचे वाईट अधिक वाटत होते. त्याचे मुख्य कारण म्हणजे मी तोपर्यंत कधीच मार खाल्लेला नव्हता. घरात ज्येष्ठ पुत्र असल्यामुळे सर्वांची उदंड माया मिळत होती. शाळेत मुख्याध्यापकांचा मुलगा म्हणून स्पेशल ट्रीटमेंट मिळत होती. अभ्यास केला नाही किंवा शाळेत उशिरा पोहचलो, कुणाची खोडी काढली, दंगामस्ती केली तरी कोणी रागावत नव्हते. त्यामुळे माझा अहंकार अधिकच कुरवाळला जाऊन वाढीस लागला होता. आणि अशा पार्श्वभूमीवर सरांनी समस्त विद्यार्थिवृंदासमोर मला फटकवावे, तेही यत्किंचित पाढे पाठ नसल्याच्या कारणावरून ! ही बाब मला झोपू देत नव्हती. मी मग माझ्या परीने घडल्या घटनेचा सूड उगवण्याचा प्रयत्न करू लागलो. मी पाढे पाठ केले. त्यानंतर वडिलांना मी तिखटमीठ लावून वर्गातली घटना सांगितली. माझे पाढे पाठ आहेत, पण सरांनी मला मुद्दामच मारले. हवे तर तुम्ही माझे पाढे पाठ घ्या..अशी भुणभुण लावली. तीन दिवसांनी वडील वर्गावर आले. त्यांनी सरांना बाहेर बोलावले. माझ्या चेहऱ्यावर आनंद मावत नव्हता. आता वडील सरांची चंपी करणार तर ! मी बाकीच्या विद्यार्थ्यांकडे गर्वाने बघू लागलो. तेवढ्यात घात झाला. वडील आणि प्रकाश पाटील सर एकमेकांना टाळी देत मोठमोठ्याने हसू लागले. फसवणूक झाल्याच्या भावनेतून मी पुन्हा शोक सागरात बुडालो. घरी आल्यावर मी चिडून पुन्हा तगादा सुरू केला. तुमच्या मुलाला मारणाऱ्या शिक्षकांशी तुम्ही हसत कसे बोलू शकता वगैरे त्रागा केला. वडिलांनी प्रारंभी माझे बोलणे हसण्यावारी नेले. पण माझी पीरपीर वाढली तसे ते चिडले आणि म्हणाले,नेहमी लक्षात ठेव.. यू आर नॉट स्पेशल ! मला त्याचा अर्थ कळला नाही (त्यावेळी पाचवीच्या वर्गापासून इंग्रजी शिकवले जात असे). दुपारी वडील झोपल्यानंतर

मी आईला विचारले, ते काय बोलले नेमके ?आईच ती...मायेच्या ममतेने म्हणाली, त्यांचं मनावर घेऊ नकोस, जा अभ्यास कर ! आमच्यातला सुप्त संघर्ष (माझ्या मते) आठवडाभर सुरू होता. एके दिवशी वडिलांनी मला आणि सरांना सोबत ऑफिसमध्ये बोलावून घेतले. चहा मागवला (त्या दोघांसाठी). त्यांच्या टेबलवर पृथ्वीची गोलाकार प्रतिकृती होती. काही सेकंद तो गोळा फिरवून त्यांनी मला जवळ बोलावले. भारताचे स्थान दाखवून त्यांनी विचारले, यात महाराष्ट्र कुठे दिसतोय ? मी महत्प्रयासाने महाराष्ट्र शोधून दाखवला. त्यांनी पुन्हा विचारले, आपला जिल्हा दिसतोय ? मी नाही म्हटलो. मग शिरपूर...अजिबात नाही.. मला एका बाजूला सरकवत ते म्हणाले, 'या जगाच्या पसाऱ्यात भारत एव्हढासा, त्यात महाराष्ट्र इतकासा...तिथे या शाळेचा हेडमास्तर कुठे नी त्याचा मुलगा कुठे ? तू कोणीतरी वेगळा आहेस हे खूळ डोक्यातून काढून टाक. तू चुकशील तर शिक्षा होईलच हे लक्षात घे.' मी जे समजायचे ते समजलो. त्यावेळी अगदी पोरका झाल्यासारखे वाटले खरे पण पुढील आयुष्यात आपण काहीतरी स्पेशल आहोत हा दंभ कधीच मनाला शिवला नाही. त्यामुळे ओळखदेख असेल तरी सर्वसामान्य माणसाप्रमाणे रांगेत उभा राहून काम करून घेणे अधिक पसंत करतो. अहंकार ही किती फालतू बाब आहे ते पावलोपावली दिसते आणि आपल्यात रुजू पाहणारी अहंकाराची विषवल्ली वेळीच छाटली गेली याचे समाधान वाटते. प्रकाश पाटील सरांची ती छडी आणि वडिलांनी घालून दिलेले उदाहरण आजही पाय जमिनीवर ठेवण्यास कारणीभूत ठरली आहेत. यू आर नॉट स्पेशल ही जाणीव वेळीच करून देत मला भरकटत जाण्यापासून वाचवल्याबद्दल त्या दोघांचे ऋण न फिटणारे आहे.

## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये    द्विवार्षिक वर्गणी - ७००  रूपये    त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री  या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका

शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

**With pay any app**

# तस्मे श्री गुरुवे नमः



अंजली नितीन देशपांडे
ठाणे

गुरु और समुद्र दोनों ही गहरे है,पर दोनों की गहराई में एक फर्क है समुद्र कि गहराई में इन्सान डूब जाता है और गुरु की गहराई में इन्सान तर जाता है..!!!
असं म्हणतात कि गुरु व समुद्र दोन्ही पण खोल आहेत पण फरक असा आहे कि समुद्राच्या खोलीत मनुष्य बुडतो व गुरुच्या खोलीत मनुष्य तरुन जातो.
आपल्या सर्वांचा पहिला गुरु आपली आई!!!
कारण पहिला शब्द तीच आपल्याला शिकवते.इतकाच काय पण लहानपणी Gender ची पण ओळख नसते अशावेळी जर घरात दोन मुलींवर मुलगा असेल तर तो आई व बहिणींप्रमाणे मी आली,मी गेले असे म्हणायला लागतो तेव्हा त्याचे व्याकरण शुध्द करणारीपण आईच असते.त्यामुळे पहिली गुरु आई...त्या आईच्या स्मृतीला वंदन,जी कायम माझ्या पाठीशी उभी होती, वेळोवेळी मार्गदर्शन केलं...कौतुक केलं...व तिला कायमच वाटायचं कि हिने तिला जे आवडेल तेच केलं पाहिजे...असो.
नंतर आपल्याला ओळख होते ती शाळेच्या गुरुंची...कारण आईचा हात सोडल्यावर जो हात हातात येतो तो असतो बालवाडीतल्या बाईंचा.तो काळ पण सरतो.प्राथमिक,पूर्व माध्यमिक,माध्यमिक असे करत करत एस.एस.सी. झाले...फार अशी काही महत्वाकांक्षा नसल्यामुळे सरळ सोट आयुष्य होत.तेव्हाच्या म्हणजे जे प्रचलित होत तो पर्याय मी निवडला.दहावी नंतर बरे मार्क्स असल्यामुळ सरळ सोट आयुष्य होत.तोच पर्याय मी निवडला...दहावी नंतर बरे मार्क्स असल्यामुळे शाखा निवडली.ग्रॅज्युएशन नंतर बी.लीब,नंतर लग्न...मुले घर सांभाळणे,कारण यजमानांची फिरतीची नोकरी व आम्ही नागपूरचे असल्याने इथे कोणीही नातेवाईक नव्हते...त्यामुळे घरी राहणे व घर,मुले ह्यांची काळजी घेणे असं सुरु होत...अर्थात घरी शिकवण्या घेणे सुरुच होतं...
आयुष्यातला टर्निग पॉईंट म्हणजे तेव्हा माझा मोठ्या मुलाने संस्कृत हा विषय घेतला तेव्हा,खरेतर माझ्या जाऊबाई ज्या संस्कृत च्या पंडिता...त्यांनी त्याला शिकवायची जबाबदारी घेतली व त्याला उत्तम मार्क पण मिळाले.पण जसा तो दहावी झाला तसे जाऊबाईंनी सांगितले कि लहान मुलाच्या वेळेस तुच त्याला शिकवायचे,त्याला अजून अवकाश आहे,तेव्हा तू आत्तापासून स्वत:शिकायला सुरवात कर.माझ्या संस्कृत मधल्या पहिल्या गुरु जाऊबाई,त्यांना वंदन.
मी विज्ञान पदवीधर,त्यात आमच्या शाळेत संस्कृत हा विषयच नव्हता,त्यामुहे मला ह्या विषयाबद्दल शून्य माहिती...जाऊबाईंच माझ्या गुरु झाल्या व त्यांच्या मदतीने मी मुंबई विद्यापीठातन संस्कृत सर्टीफिकेट च्या कोर्स ला प्रवेश घेतला,व इथेच अगदी पहिले lecture जे आमच्या डॉ.गौरी माहुलीकरांच होतं मी त्यांच्या प्रेमातच

पडले गुरु कसा असावा ह्याबद्दल चे सर्व काही निकष त्यांच्या बाबतीत अगदी शंभर टक्के लागू होतात.त्यांच्या मार्गदर्शनीखाली डिप्लोमा पण केला.

सर्वांचं असं मत पडलं कि आता मला दहावी पर्यंत संस्कृत हा विषयसहज शिकवता येईल.पण इथं माझे यजमान...ह्यांनी सुचवले कि जर मला दहावी पर्यंत शिकवायचे आहे तर मला अजुन ज्ञान मिळवायला हवे..मग मी विद्यापीठातच प्रवेश परीक्षा देऊन एम.ए.प्रथम वर्षांपासून प्रवेश घेतला व संस्कृत मध्ये पदवी प्राप्त झाली.ही चारही वर्षे माझे अगदी मंतरल्या सारखे होते.खरे तर खुप अडचणी होत्या...रोज ठाणे ते कलिना प्रवास तो पण वयाच्या ३८ व्या वर्षी घर,मुले,यजमानांची नोकरी व तेव्हाच पुतण्या पण नोकरी शोधायला मुंबईला आला होता...आता विचार केला तर असे वाटत कसं निभावलं हे सगळं....

हे सगळं शक्य झालं ते केवळ माहुलीकर मॅडम यांचेमुळे मला आठवतंय सर्टिफिकेट कोर्स चे lecture त्या नेहमी सुभाषिताने करायच्या..त्यांचे शिकवलेले पहिले सुभाषित..अनारम्भम हि कार्यस्य प्रथमं बुध्दी लक्षणं...त्यांचं वर्गात प्रवेश कारणं,हसुन सर्वांकडे नजर फिरवणं,व शांत आवाजात सुरुवात करणं अजूनही डोळ्यासमोर आहे.त्यांची स्टाईल मात्र मी कॉपी केली मुलांना जास्तीत जास्त सुभाषिते सांगणे व वर्गात प्रवेश केला कि हसून नजर सर्वांवर नजर फिरवणे)

त्यांचं एम.ए.चे शांकारभाष्याचे lecture म्हणजे पर्वणीच असायची तेव्हा असे वाटायचे कि आपल्याला सर्व समजले आहे पण लिहतांना खुप तारांबळ व्हायची मॅडम संस्कृत पंडिता आहेत,त्यांना कितीतरी पुरस्कार प्राप्त झाले आहेत,अतिशय नम्र,मराठी,इंग्रजी,संस्कृत विषयावरची हुकूमत..पण आपण म्हणतो न Down to Earth अशा आहेत.ज्या आत्मीयतेने त्या वर्गातल्या हुशार विद्यार्थिनींशी बोलायच्या त्याच किंबहुना जरा जास्तच आत्मीयतेने माझ्या सारख्या विद्यार्थिनीशी संवाद साधायच्या.मला नेहमी असंच वाटायच कि मॅडम आपल्यावर खुप प्रेम करतात.

मॅडमांच्या मार्गदर्शनामुळे मी खूप संपन्न झाले त्यांच्या Magnetic Personality मुळे त्या जसे बोलत,संवाद साधत,ती जास्तीत जास्त कॉपी करण्याचा मी प्रयत्न केला व शाळेला व विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाचा फायदा व्हावा असाच माझा प्रयत्न राहिला.माझ्या प्रामाणिक प्रयत्नांना खूप छान प्रतिसाद मिळाला. शाळेच्या निकालाचा संस्कृत ह्या विषयाचा आलेख सतत उंचावत राहिला.

शेवटी व.पु.काळे यांनी म्हटल्याप्रमाणे आयुष्य म्हणजेच एक संघर्ष,पण हा संघर्ष फक्त आयुष्यात एक ठराविक उंची गाठेपर्यंत!एकदा का ती उंची गाठली,की आयुष्याचा पुढचा संघर्ष ती उंचीच संपवते आपण मात्र कृतज्ञ राहायचं,त्या घराचं ,त्या गल्लीच,त्या शहराचं,त्या शाळा,कॉलेज,कंपनी,मित्र मैत्रीणी,सहकारी,नातेवाईक यांचं,आयुष्यातल्या प्रत्येक वळणावर त्यांनी योग्य वेळी दिलेली साथ,ज्यामुळे आपण एका ठरावीक उंची गाठू शकलो आणि आयुष्याचा नवनवीन अर्थ समजत गेला,समृध्द करत गेला.एक परिपूर्ण जीवन जगण्यासाठी! हे पण आपले गुरु?नाही का?

-९९८७०८८००८१

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे **Reg No.**

गुरुपोर्णिमा विशेष

# तस्मै श्री गुरुवे नमः



किरण दशमुखे
सटाणा-नाशिक

जीवनात प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडून शिकत असतो. माणूस हा समाजशील प्राणी असल्याने त्याचे शिक्षण समाजात होत असते. शिक्षणाचा प्रकार कधी औपचारिक तर कधी अनौपचारिक असतो. औपचारिक शिक्षणात व्यक्तीच्या जीवनात गुरुचे महत्त्व फार असते.

माऊली ज्ञानेश्वर गुरुचे वर्णन करतांना म्हणतात,

मज हृदयी सद्‌गुरु। तेणेची तारीला हा संसारपुरू।।
म्हणौनी विशेषै अत्यादरू। विवेकावरी।।

गुरु म्हणजे जो लघु नाही तो. ज्याप्रमाणे द्रव पदार्थ उंचावरून खोल भागाकडे वाहत जातो, त्याचप्रमाणे ज्ञानाचे संक्रमण होत असते. यामुळेच गुरुचे स्थान उच्च समजले जाते आणि ते तसे असणे महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे आपण म्हणतो, 'यथा राजा, तथा प्रजा' किंवा 'बाप तैसा बेटा, कुंभार तैसा लोटा,' त्याचप्रमाणे म्हणता येईल की, जसा गुरु तसा शिष्य'. गुरुला परिसाची उपमा दिली जाते.ज्याप्रमाणे परिसाचा स्पर्श झाला लोखंडाचे सोने होते.

त्याप्रमाणे गुरुच्या स्पर्शाने शिष्याचे जीवन सोन्यासारखे उजळून निघते. कधी कधी गुरु शिष्याला आपल्यासारखेच बनवतो. शिष्याची जशी योग्यता असेल तसा तो बनतो.

गुरुला शिष्य आपल्या समान बनावा असं वाटतं. एवढेच नव्हे तर आपल्यापेक्षा अधिक ज्ञान त्याने मिळवावे अशी खऱ्या गुरुची तळमळ असते. शिष्य गुरुपेक्षा वयाने, ज्ञानाने अपरिपक्व असतो, त्यावेळी गुरु त्याला ज्ञानामृत देऊन सशक्त बनवतो. गुरु केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही तर जीवन कसं जगावं हे शिकवतो. मानवाला पुरातन काळापासून अशा गुरुंनी ज्ञान देण्याचे कार्य केले आहे. यापैकीच एक महान गुरु म्हणजे महर्षी व्यास. महर्षी व्यास हे जीवनाचे श्रेष्ठ भाष्यकार होते. व्यासांनी समाजाला एक चांगली शिकवण दिली. व्यास हे सर्वश्रेष्ठ समाजशास्त्रज्ञ होते. त्यांचे वैदिक व लौकीक ज्ञान हे अमर्याद होते. याबद्दल म्हटलं जातं,'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम'. व्यासांनी समाजाला विविध क्षेत्रांतील ज्ञान समजावून सांगण्याचे कार्य केले. समाज मनातील अज्ञानाचा अंधकार घालवून ज्ञान ज्योत पेटवली.

म्हणून ते सर्वश्रेष्ठ गुरु ठरले. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता म्हणून व्यासपौर्णिमेला 'गुरुपौर्णिमा' साजरी केली जाते. या निमित्ताने गुरुबद्दलचा आदर व्यक्त केला जातो.

गुरु-शिष्यांच्या अनेक जोड्या प्रसिध्द आहेत.

१)चंदनगुरु: ज्याच्या सतत सहचर्याने जीवनाला सुगंध येतो तो चंदनगुरु.

२) विचारगुरु : जो दैवीविचार व जीवनदृष्टी देतो आणि विचार बदलवितो तो दैवी गुरु

३) अनुग्रहगुरु : शिष्यामध्ये बुध्दी कमी असेल पण शिष्याची श्रध्दा व विश्वास मोठा असेल तर त्याला गुरु पुढे घेऊन जातो.

४) पारसगुरु: हा गुरु संबंधाने शिष्याला बदलतो. भक्ती, शक्ती व प्रेम बोटाला लावून स्पर्श करतो व शिष्य बदलतो.

५) कूर्मगुरु : कासव दृष्टीने, अवलोकन करून पिलाचे पालन करतो, तसा गुरूच्या अभिदृष्टीने शिष्याचा जीवन विकास होतो.

६)चंद्रगुरु : चंद्र जसा दूर राहूनही चंद्रकांत मण्याला पाझर फोडतो, तसा चंद्रगुरु स्वत:च्या प्रभवाने दूर असलेल्या शिष्याच्या जीवनातही परिवर्तन निर्माण करतो.

७) दर्पणगुरु : जसे आरशामध्ये व्यक्ती स्वत:चे रुप पाहू शकतो तसे दर्पणगुरुमध्ये जीवनदर्शन घडते. शिष्य अशा गुरुचे अनुकरण करुन आपला विकास साधतो.

८)क्रौंचगुरुः क्रौंच पक्षाची मादी सहा सहा महिने दूर राहून स्वत:च्या अंड्यांचे पोषण करते. तसा हा गुरु दूर असलेल्या परोक्ष शिष्याचे स्मरण करुन त्याच्या विकासात सहाय्यभूत बनू शकतो.

भारतीय संस्कृतीने गुरुला नेहमी पूज्यस्थानी मानले आहे. गुरु विश्वाचे त्याचप्रमाणे त्यातील शक्तीची ओळख देतो. जीवनाला सुंदर, निर्दोष व पवित्र बनवून मार्गावर चालायला शिकवतो. आपले जीवन सुगंधीत करतो, त्या सदगुरुच्या स्मरणाचा हा दिवस, अशा सर्व गुरुंना वंदन करतो.

-९४२०८९५७५

## मागे वळून पहातांना...

स्वातंत्र्यदिना पूर्वी म्हणजे २२ जुलै १९४७ रोजी भारताच्या घटना समितीने आपल्या बैठकित तिरंगी ध्वज हा स्वतंत्र भारताचा अधिकृत ध्वज राहिल,असा निर्णय घेतला आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजे पहिल्या स्वातंत्र्यदिनी हाच तिरंगी ध्वज राष्ट्रध्वज म्हणून फडकवला गेला.पुढे २६ जानेवारी,१९५० रोजी भारत प्रजासत्ताक झाला तेव्हा आणि तेव्हापासून पुढेही कोणत्याही बदलाशिवाय हाच ध्वज कायम राहिला. ध्वजाची लांबी २:३ या प्रमाणात निश्‍चित करण्यात आली.तीन समान आडव्या पट्टयांची रचना असलेल्या या तिरंगी झेंड्याच्या वरच्या भागात त्याग व धैर्याचा निर्देश करणारा गडद केशरी रंग, मधल्या भागात शांती,सत्य ध्वनीत करणारा पांढराशुभ्र रंग आणि खालील भागात व समृध्दीचा निर्देश करणारा गडद हिरवा रंग आहे.ध्वजाच्या मधोमध मधल्या पांढऱ्या भागात निळ्या रंगातील अशोकचक्राची येजना करण्यात आली.होती.या ध्वजाची पूर्ण रचना,संकल्पना पिंगाली व्यंकय्या या कलाकराने साकार केलेली होती.स्वातंत्र्य चळवळीच्या काळात या ध्वजामध्ये अनेक बदल होते गेले होते.१९०७ साली स्वातंत्र्य सैनिक भिंखाजी कामा हिने स्वत:तिरंगी झेंड्याची रचना करुन त्यात मधोमध वंदे मातरम हे शब्द लिहिलेले होते आणि तेव्हा जर्मनीमध्ये हा झेंडा फडकवून तिनं आपलं मातृभूमीबद्दलचं प्रेम व्यक्त केलं होतं.पुढे काही काळ काँग्रेसनं अशाच तिरंगा झेंड्यावर चरखा दर्शवून गांधीजींचा स्वावलंबनाचा संदेश दिलेला होता.

मौर्य घराण्यातील सम्राट अशोक याने दक्षिण आशिया ते आजचं अफगणिस्तान बंगाल असा सर्वदूर आपला साम्राज्यविस्तार केला.परंतु नंतर त्यातील हिसेनं पश्‍चाताप झालेल्या अशोकानं बौध्द धर्म स्वीकारुन शांतीचा संदेश दिला.स्वतंत्र्य भारतालाही त्याच स्वरुपाचा शांतीचा संदेश अभिप्रेत असल्याने अंतिमत: राष्ट्रध्वजावर चरख्याच्या जागी धम्मचक्र सूचित करणाऱ्या चक्राची योजना करण्यात आली.त्याचप्रमाणे या चक्राव्दारे कालचक्राचं व त्यासोबत बदलत जाणाऱ्या जगाचं सूचनही अभिप्रेत होतं.

# तस्मै श्री गुरुवे नमः



**सीमा श्रीराम मोडक**
नंदुरबार

नेमेची येतो पावसाळा असं असलं तरी दरवर्षी येणाऱ्या पावसामुळेच निसर्गात पुनउत्पादन होवू शकतं.अप्रतिम निसर्गाचं देखणं रुप नेत्रसुख देतं अगदी याचप्रमाणे दरवर्षी आपण गुरुपोर्णिमा उत्साहात साजरी करतो निसर्गाची शोभा पावसानं वाढते,तशीच सुसंस्कृत सुजाण मानवाची पिढी गुरुंमुळे शोभते खरंच कधी कधी असं वाटतं या विश्वात गुरुचं नसते तर? तर मला वाटतं हे जग सुसंस्कृत,सुजाण,सुश,सुशिक्षित झालंच नसतं.आपण म्हणतो अनुभव हा खूप मोठा गुरु आहे. अगदी बरोबर आहे. पण त्यासाठी तो अनुभव येईपर्यंत वाट पहावी लागत ना निर्जीव वस्तु निसर्ग निसर्गातील प्रत्येक घटक आपल्याला शिकवितं असतो.पण केव्हा? जेव्हा आपण तिथपर्यंत पोहोचू.मग अशावेळी आपल्याला प्रत्येक गोष्टीची शिकवण देणारे गुरु अर्थात शाळेतील शिक्षक हे खुप महत्वाचे ठरतात.इ.५ वी ते १० वीला शिकणारे विद्यार्थी हे जीवनातील ज्ञान घेण्यासाठी अगदी योग्ण वयाचे असतात असं मला वाटतं.मग साहजिकच या सुंदर कळ्यांना या सगळ्या छोट्या मित्रांना आकार देण्याचं महत्वाचं काम गुरु करतात.गुरु हे अनुभव येण्यापूर्वीच शिकवितात. हे त्यांचं खूप महत्व आहे. कोणत्या कृतीमुळे अनुभव येऊ शकतो. किंवा आपल्या कोणत्या कृतीमुळे आपण जीवनात यशस्वी होवू शकतो.त्यासाठी आपण आचरण केले तर आपल्याला आपल्या सुखी,समाधानी जीवनाचा मार्गंच सापडतो म्हणून गुरुंचं आपल्या संगळ्याच्या जीवनात खूप महत्व आहे. डोंगऱ्या कडयावरुन उडी मारणं हे जीवीताला धोका दायक आहे. ह्याची कल्पना गुरु पुर्वीच देतात.अडचणी,संकट यापासून कसं दूर राहावं याचं मार्गदर्शन गुरु आपल्याला वेळोवेळी करत असतात पण अनुभव घेण्यासाठी मात्र या परिस्थिती कुचकामी असतात कारण असे अनुभव जीवावर बेतू शकतात.म्हणूनच गुरु आपल्या शिष्याला जीवनातील मार्गावरील काटे कसे दूर करायचे आणि मार्गांने यशाची फुलं कशी येतील हे वारंवार निदर्शनास आणून देतात.आपला शिष्य वाममार्गाला जात असेल तर ते त्यांच्या पालकांपेक्षा शिक्षकांनाच त्वरीत लक्षात येतं त्यावर ते प्रत्येक विद्यार्थ्यांच्या कलाकलाने घेऊन प्रत्येकासाठी वेगळी पध्दत वापरुन त्याला पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्याचं महत्वाचं कार्य करतात.खरंच अशा सर्व गुरुंचं आपल्या सगळ्यांच्या जीवनात अमुल्य स्थान आहे. हे आपल्या सगळ्यांना कोरोना काळात लक्षात आलंच आहे.

जसं शिक्षणाशिवाय पर्याय नाही तसंच मला वाटतं शिक्षकांशिवाय ही पर्याय नाही. अहो ऑनलाईन क्लासेसच्या बाजारात भावनाप्रधान शिक्षक सापडतो का ? प्रसंगी चेहरा पाहून,आवाज ऐकूनही विद्यार्थ्यांची नाडी ओळखणारा शिक्षक म्हणजे खरोखर महानच

म्हणून दरवर्षी नव्हे तर दररोज गुरुचं माहात्म्य गायलं तरी ते कमीच आहे.

**(सीमा श्रीराम मोडक ह्या,डॉ.काणे गर्ल्स हायस्कूल नंदुरबार येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत)**

**-९४२०७६२७३०**

# टेक्सास शाळेचा धडा

वास्तव



डॉ.विजय पांढरीपांडे
हैदराबाद

काही दिवसापूर्वी टेक्सास अमेरिका येथील शाळेत एका १८ वर्षे वयाच्या माथेफिरू मुलाने गोळीबार करून अनेक शाळकरी मुलांना ठार मारले.ही घटना अत्यंत क्लेशदायक आहे.बी बी सी वरील बातम्यांची दृश्ये हृदय द्रावक अशीच आहेत.जग कुठल्या दिशेने चालले आहे.निसर्ग निर्मित विषाणू पेक्षाही हा विकृत मानव निर्मित विषाणू पुढच्या पिढी साठी अत्यंत घातक आहे.पाश्चात्य संस्कृतीत जे स्वातंत्र्य अभिमानाने शेखीने मिरवले जाते,त्या मोकळ्या स्वातंत्र्याचे पुरेपूर धिंडवडे निघाले आहेत.भारता सारख्या देशात जे पारंपारिक संस्कार,शिक्षण,दिले जाते त्याला नावे ठेवणाऱ्या, नाक मुरडणाऱ्या पाश्चात्य मंडळीना ही चांगली चपराक आहे.पंधरा सोळा वर्षे झाली की मुले स्वतंत्र होतात,आई वडिलांपासून वेगळी राहतात,कमवायला लागतात.या गोष्टींचे कौतुक आहेच.पण बहुतांशी तरुण तरुणी मद्य,ड्रग च्या आहारी जातात.खुले लैंगिक व्यवहार नैसर्गिक गरज मानतात,मुली अबॉर्षन करतात,लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहतात,त्याचे काय?या मुक्त व्यवस्थेचे फायदे कमी अन् तोटे जास्त आहेत हे या नव्या पाश्चात्य पिढीला समजत नाही.समजून घेण्याची इच्छा नाही.विशेष म्हणजे त्यांचे पालक,शिक्षक यांना देखील ती गरज वाटत नाही.वाटत असली तरी त्याचा काही उपयोग नाही या जाणिवे पोटी ते हतबल झाले आहेत.शाळेत नैतिक मूल्याचे धडे कम्पल्सरी दिले जावेत हा आपला आग्रह.तिकडे मुलांना मोठी झाल्यावर हवे तसे वागू द्या, त्यांचे निर्णय त्यांना घेऊ द्या हा युक्तीवाद.इतक्या भयंकर घटना नंतर देखील सरकारला गन लायसेन्स संबंधी कायदा

बदलावासा वाटत नाही.इथे पालक शिक्षकाची नव्हे तर सरकारची हतबलता दिसून येते.आपण देखील या पासून वेळीच धडा घेणे गरजेचे आहे.गेल्या काही महिन्यात घडलेले खून,त्या मागची कारणे,तरुण पिढीत वाढत चाललेली बेजबाबदार प्रवृत्ती,गावातून शहरांत गेलेल्या तरुण तरुणी ची शीघ्र वेगाने बदलत चाललेली मानसिकता,समाजातील विषमतेमुळे आलेले नैराश्य,सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे वाढलेली सैरभैरता,अवती भवती च्या दूषित राजकारणामुळे भरकटलेली वैचारिक क्षमता हे सारे दुर्लक्षित करण्या सारखे नाही. काही महिन्या पूर्वी कुणा एकाच्या फोन वरील मेसेजच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून हजारो मुले अल्पावधीत परीक्षे संबंधी आंदोलना करिता एकत्र जमली होती.सरकारची गाळण उडाली होती.ही घटना काय दर्शविते? गावा खेड्यातील मुले शिक्षण,अध्ययन यापेक्षा एळाद्या नेत्याच्या मागे उपरणे घालून,झेंडे हाती घेऊन उसने नारे मारण्यात ,घोषणा देण्यात धन्यता मानतात.शाळा कॉलेजची मुलं कुणा राजकीय पुढाऱ्यांना हाताशी घेऊन नको त्या मागण्या मान्य करण्यास सरकारला,विद्यापीठाला भाग पाडतात.त्यात त्यांचेच नुकसान आहे हे त्यांना कळत नाही.त्यांना शॉर्टकट हवा असतो.तत्कालिक फायदा हवा असतो.आपले खरे भले

कशात आहे हे त्यांना कळत नाही.राजकारणी नेते या तरुणाईला हाताशी धरून आपली पोळी भाजून घेतात. या मुलांना पुढे करून ते आपला कार्यभाग साधत असतात. आता तर न्याय संस्थे ऐवजी राजकीय पुढारी,पक्ष यांना हाताशी धरून जोर जबरदस्ती करून कार्यभाग साधायचा किंवा मीडिया चॅनल ला हाती धरून तिथल्या अभिरूप न्यायालयात खटला चालवायचा असे प्रकार चालू आहेत.च्यानल वर चर्चेत एखाद्या लहान मुलाला घास भरवावा तसे सूत्रधार आलेल्या तज्ज्ञांना शब्दांचे घास भरवतात,अन् तज्ञ देखील ते उष्टे घास खाण्यात धन्यता मानतात!एकीकडे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते अशी बोंब मारायची अन् दुसरीकडे सोशल मीडियावर वाटेल तशी गरळ ओकायची असा प्रकार सुरू आहे.गेल्या काही महिन्यांत नागपूर, ओरंगाबाद येथे घडलेलले खूनसत्र चिंता करण्या सारखेच आहे.तिथेही बहुताशी तरुण मुलाचा हात आहे ,भाग आहे. अगदी क्षुल्लक कारणावरून खुना पर्यंत मजल जावी हे चिंताजनक आहे. काही ठिकाणी सह्रदाना मारले आहे निर्घृणपणे.घरचे दूषित कौटुंबिक वातावरण,कुटुंबातील हरवलेला संवाद,शिक्षकाचा नसलेला प्रभाव,शाळा कॉलेजातील बदललेले वातावरण,समाजातील एकूणच नीती मत्तेची घसरण हे सारे याला कारणीभूत आहे.शहरात आय टी क्षेत्रात गेलेली तरुण पिढी देखील अचानक हाती आलेल्या पैशांमुळे बदलली आहेत. त्याच्या पार्ट्या, ऑफिसच्या कामाने बाहेर गेल्यावर मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरवापर हे देखील फारसे चर्चिले न जाणारे पण चिंतेचे विषय आहेत.या वर्गात , तसेच सिने नाटक क्षेत्रात एकट्या राहणाऱ्या तरुण वर्गात लिव्ह इन् रिलेशनशिप चे प्रमाण वाढले आहे.तिथेही नैराश्यातून होणाऱ्या आत्महत्या,द्वेषातून एकमेकांचा काटा काढणे हे प्रकार वाढले आहेत. एकूणच नीती मत्तेची घसरण सर्व क्षेत्रांत चालली आहे.अजून आपल्या शाळेतील मुलांच्या हातात गन आलेली नाही. पण त्याच्या हातातले दगड देखील कमी घातक नाहीत.काश्मीर मध्ये तरुणाईला हाताशी धरून जे घडले, उडता पंजाब मध्ये जे चालले आहे ते

देखील दुर्लक्ष करण्यासारखे नाही.केवळ नद्या तलाव दूषित होत नाहीत.अख्खा तरुणाईचा सागर दूषित होत चाललाय.गंगेच्या स्वच्छता मोहिम अभियाना पेक्षा तरुण पिढी नीट मार्गी लावण्याचे अभियान अधिक जरुरी,महत्वाचे आहे.यामागची कारणे शोधावी लागतील.समाज शास्त्रज्ञ, मनोविकास तज्ञ , शिक्षण तज्ञ यांनी एकत्र येऊन या गंभीर विषयावर विचार मंथन करायला हवे.यामागची खरी कारणे,बदलती समाजव्यवस्था,संस्कृती, मूल्य विचार याचा सर्वांगाने अभ्यास व्हायला हवा.एरवी करोना सारखे आग लागल्यावर विहिरी खणत बसल्यासारखी स्थिती होईल.हा कॅन्सर सारखा रोग आहे.तो पहिल्या स्टेज वरच आवरायला हवा.पुढच्या स्टेज मध्ये परिस्थिती गेली की हाती काहीच राहत नाही. पाश्चात्य देशात अशीच अवस्था आहे.दिलेले स्वातंत्र्य परत घेणे,निर्बंध सोडल्यावर ,लगाम लावण्याचा प्रयत्न करणे अवघड असते. आपण या घटना

पासून शिकायला हवे.वेळीच सावध व्हायला हवे.सोशल मीडिया वापरावर कुठे तरी नियंत्रण हवे.घरातील माणसांनी निदान जेवायच्या वेळी एकत्र यायला हवे. एकमेकाशी बोलायला हवे,अडचणी असल्या तर मोकळे पणाने त्यावर चर्चा करायला हवी.संवादाने प्रश्न सुटतात.निदान सोपे तरी होतात.घरातील वडीलानी पोलिसा सारखे नियंत्रण ठेवले नाही तरी विचारपूस करायला हवी मुलांना. ते कुठे जातात,काय करतात, त्यांचे मित्र मैत्रिणी कोण आहेत ही माहिती हवी.याला कंट्रोल म्हणता येणार नाही.स्वातंत्र्यावर आघात म्हणता येणार नाही.ज्यात काही गैर नाही असे आपल्याला वाटते ते शेअर करण्यात अडचण ती काय? जी गोष्ट लपवून करावीशी वाटते ती वाईट, ही साधी व्याख्या समजून घ्यावी. मुलांवर विना कारण नियंत्रण नको हे खरे तसेच नको तितके स्वातंत्र्य देखील नकोच!शेवटी सुवर्ण मध्य महत्वाचा.बॅलन्स साधणे महत्वाचे.अतिरेकानेच अतिरेकी निर्माण होतात.म्हणूनच टेक्सास चा धडा महत्वाचा. तो ऑप्शनल ला टाकण्याचा विषय नाही एवढे समजले तरी पुरे

–७६५९०७४५५५

# पुस्तकांशी नाते जोडतांना



**युवराज माने**
सेलू-परभणी

मुलांना स्वतःहून यावंसं वाटेल,आनंदाने शिकावं वाटेल असे सुंदर ठिकाण म्हणजे 'शाळा'.हे निर्माण करण्याचे स्वप्न माझ्या डोक्यात सातत्यानं होतं त्यासाठीचा ध्यास सुरू होता,आजही तो कायम तसाच आहे.शाळेच्या वेळेपूर्वीच धावतपळत येणारी मुलं पाहून मनाला समाधान वाटतं.शाळेने मुलांना लावलेला लळा हेच आमच्या धडपडीच फळ होय.मुलांसाठी काहीतरी नवं नवं करण्याच्या कल्पना ह्या मुलांच्या कृतीतून व वाचनात येणाऱ्या पुस्तकातून डोक्यात यायच्या आणि प्रत्यक्ष कृतीत उतरायच्या.गोंदिया जिल्ह्यात आदिवासी व नक्षलग्रस्त भागात काम करताना बोलीभाषेचा प्रभाव अधिक होता.भाषा कोणतीही असो पण मुलांचं मानसशास्त्र सर्व ठिकाणी सारखच.मुलांच्या सहज कृतीतून अनेक भन्नाट कल्पना सुचत होत्या.त्यातीलच एक म्हणजे 'वाचनाचा आनंदसोहळा'!

एके दिवशी दुपारच्या सुट्टीत माझ्या टेबलाभोवती आरती,साधना,वर्षा,मेघा,शिल्पा व गुलशन उभे राहून काहीतरी चर्चा करत होते.माझ्या टेबलावर असलेल्या पुस्तकाचे पानं चाळत आरती काहीतरी सांगत होती.सर्वजण ऐकत होते.मधेच मेघाही काहीतरी दाखवत होती.हे मी खिडकीतून पहात होतो.वर्गात येताच वर्षा म्हणाली,गुरुजी,आम्हाला हे पुस्तक वाचून दाखवा ना. हे ऐकून मला खूप आनंद झाला.कारण मी याचं दिवसाची आतुरतेने वाट पाहात होतो.मुलांनी स्वतःहून पुस्तकाकडे आकर्षित व्हावे,त्यांचे हात पुस्तकाकडे वळावेत....यासाठी मी दररोज टेबलवर,वर्गात,मुलांच्या नजरेस पडतील अश्या ठिकाणी पुस्तकं ठेवत होतो.जेवणाच्या सुट्टीत मी स्वतः वर्गात पुस्तक वाचत




बसायचो.त्यामुळे मुलंही वर्गात पुस्तकं चाळायची,चित्र पहायची,पुस्तकातील चित्रावर चर्चा करायचे,मुलांना वर्गात मांडलेल्या पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षित करायचे.हे मी सर्व डोळ्यात साठवून ठेवायचो अन,मुलं कधी एकदा स्वतःहून पुस्तक वाचू लागतील व माझ्याकडे नवनवीन पुस्तकांची मागणीही करतील याची वाट पहायचो...

अखेर ती प्रतीक्षा संपली.वर्षा प्रमाणे इतरही लेकरं पुस्तक वाचून दाखवण्याची मागणी करू लागली.मग दररोज दुपारी जेवणाच्या सुट्टीत जेवण

झाल्यास आम्ही शाळेच्या मैदानात असलेल्या झाडाखाली तर कधी वर्गखोलीत एकत्र बसून पुस्तक वाचू लागलो.मुलांना मी वाचून दाखवलेलं खूप आवडू लागलं.यावेळी अनेक मासिके व पुस्तके माझ्या मदतीला धावून आली.खरं तर माझीही पुस्तक वाचनाची सुरुवात खूप उशिरा झाली.याचे शल्यही 'मनात सतत खुपतं.शिक्षक म्हणून मी सेवेत रुजू झालो पण केवळ गुणार्थी म्हणून! मुलांसोबत अनेक गोष्टी शिकताना किंबहुना शिकवताना आपल्याकडे काहीच नाही,आपलं भांडवल शून्य वाटू लागलं.लेकरांना दररोज नवनवे हवे असते.त्यांना ते देताना स्वतः च्या खुजेपणाची जाणीव झाली.मुलांना उत्तम द्यायचं असेल तर उत्तम ते ग्रहण करावे लागेल याला पर्याय नाही असं वाटू लागलं.

मग माझा पुस्तक वाचनाचा प्रवास सुरू झाला. आणि या प्रवासात पहिलं पुस्तक हाती आलं ते म्हणजे डॉ.आ ह साळुंखे सरांचं चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये म्हणून... अगदी एका दमात ते वाचून पूर्ण केलं. पुस्तक वाचताना प्रत्येक लेखातून अंगावर शीतल चांदणं पडल्याचा अनुभव येऊ लागला.शेवटच्या लेखावर येवून जेव्हा थांबलो तेव्हा मनात खूप मोठं शल्य दाटून आलं.

पुस्तक वाचन म्हणजे आनंद असतो.

पुस्तक वाचनाने माणूस दररोज नवा होतो.

पुस्तक वाचनाने माणूस समृद्ध होतो....

ही पुस्तकाची जादू मला आजवर कुणीच कशी सांगितली नाही याचे फार फार दुःख झालंपुस्तक वाचनातून होणाऱ्या आनंदास आजपर्यंत मुकलो याचा पश्चाताप होऊ लागला.एखाद्या गुरुजींनी तरी ही गोष्ट लक्षात आणून द्यायला हवी होती असं वाटू लागलं..मनात गुरुजींचा रागही येऊ लागला.आयुष्यातील पंचवीस वर्ष या आनंदापासून मुकलो याचा खेद मनात होऊ लागला. आता आपण स्वतः जरी या आनंदास पारखा झालो असलो तरी आता यापुढे आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला, प्रत्येक व्यक्तीला वाचनाच्या शीतल चांदण्यात भिजवल्याशिवाय राहायचं नाही असा ठाम निर्धार केला अन,वर्ग पहिलीपासूनच लेकरांना पुस्तकाची गोडी लागावी यासाठीचा भन्नाट प्रवास सुरू झाला....

वेगवेगळ्या वयोगटानुसार पुस्तकांची निवड करू लागलो.वेगवेगळ्या मासिकांची मागणी करू लागलो. जवळपास सर्वच वर्गांमध्ये झुलते वाचनालय,वाचन कोपरा, वाचन पेटीची रचना केली. शासकीय पातळीवरून शाळेला मिळालेल्या पुस्तकांच्या 'पेट्या खुल्या करण्यात आल्या. वर्गात लटकणाऱ्या पुस्तकात,वाचन कोपऱ्यात स्थानापन्न झालेले अनेक शब्दप्रभूंची मांदियाळी मुलांना आता खुणावू लागली. मुलांना वाचन गोडी लागणं फार महत्त्वाचं होतं.दुपारी जेवणाच्या सुट्टीमध्ये कधी कथा तर कधी कविता तर कधी एखाद्या पुस्तकाचं 'क्रमनुसार प्रकट वाचन करून लागलो.सुरुवातीला काहीच मुलं माझ्या आजूबाजूला बसून ते ऐकू लागले.वाचन सोहळा नित्यनेमानं सुरू होता. मुलांसाठी वाहिलेलं किशोर मासिक आमच्या पर्यंत यायचं पण कधीतरीच.त्यातीलच एका मासिकांमध्ये विश्वासाचा परीसस्पर्श' प्रवीण दवणे यांची कथा मुलांना वाचून दाखवली. मुलांच्या भावविश्वातील प्रसंग त्यामध्ये होते. त्यामुळे मुलांना खूप आनंद झाला.मुलांच्या 'चिमुकल्या हातांनी आपसूकपणे टाळ्यांचा गजर केला.पुढे 'त्याच मासिकामधील आठवणीतील भाऊबीज' बबन शिंदे यांनी लिहिलेली कथा मुलांना वाचून दाखवली.कथा वाचून पूर्ण होताच मुलांच्या डोळ्याकडे पाहिलं तर मुलांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. हा लेखकाचा फार मोठा विजय होता.लेकरांच्या ह्रदयास हात घालणं आणि ह्रदय जिंकणे हे ज्याला जमलं त्यानं बालमनाचा ठाव घेतला समजावा.या दोन्ही शब्द प्रभुंना मुलांच्याहस्ते पत्रलेखन करून कृतज्ञता व्यक्त केली. मुलांच्या पत्राला त्याच तत्परतेने दोन्ही लेखकांनी तर दिलं.तिथून पुढे पत्रमैत्री' असा उपक्रम सुरु झाला.डॉ.आ.ह साळुंखे सरांनी कृतज्ञता' हा सर्वात मोठा संस्कार आहे.' हा गुरु मंत्र शब्दबद्ध करून आमच्या लेकरांसाठी पाठवून दिला.ज्ञान व आनंद देणाऱ्या प्रत्येक लेखकाविषयी मुलं आता

कृतज्ञाता व्यक्त करू लागली....

आनंदाच्या वाचनसोहळ्यामध्ये मुलांची संख्या झपाट्याने वाढू लागली. वाचनाच्या आनंदसोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक शब्दप्रभू मुलंसोबत येऊन संवाद साधू लागली.कधी छान कविता तर कधी विज्ञानातील रंजक गोष्टी मुलांच्या गळी उतरवू लागले.अगदी वर्ग पहिली ते आठवीपर्यंतचे मुलं एकाच वेळी या वाचनाच्या आनंदसोहळ्यात सहभागी होऊ लागले.मुलांच्या वाचनाच्या आवडी-निवडी माझ्या लक्षात येऊ लागल्या. लहान मुलांना चित्रांची व मोठ्या अक्षरांची पुस्तक आवडू लागली.लहान मुलांसाठी रंगीबिरंगी चित्रांची पुस्तक, कवितांची पुस्तक वेगळी करून त्यांच्यासाठी खेळणी स्वरूपात त्यांच्यासमोर मांडू लागलो.वरिष्ठ वयोगटातील मुलांसाठी माहितीपर व कुतूहलपर पुस्तकांची मांडणी करून कोपऱ्यांमध्ये ठेवू लागलो.पाचवी ते आठवी वयोगटातील मुलं आत्मचरित्रात्मक पुस्तकांची मागणी करू लागले. मुलांचे वाचन कधीच एक सुरी नसतं.त्यांना जादूची तर कधी पक्षांची,प्राण्यांची,जंगलातल्या गोष्टींची तर कधी आजूबाजूला दिसणाऱ्या-घडणाऱ्या गोष्टींची सगळीच पुस्तके आवडतात.शाळेत सर्वच वर्गात पुस्तक मांडल्यामुळे मुलांना पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य मिळू लागलं.कधी कधी मुलं पुस्तक घेऊन ती अर्धवट वाचत होती. पण परत कधीतरी ते पुन्हा पूर्ण करतील मला अशी अपेक्षा वाटायचीते पुर्ण वाचण्याची सक्ती मी त्यांना कधीच केली नाही.काय वाचलं हे त्यांनी स्वतः हून सांगितलं तर उत्तमच समजयचो. त्यांच्या पाठीमागे कधी तगादा लावला नाही.एकदा वाचनाची गोडी लागली ,पुस्तकावर प्रेम जडलं की मग पुस्तकं या लेकरांना आयुष्यभर साथ करतील हा माझा ठाम विश्वास होऊ लागला....

मुलांबरोबर काम करताना मला एक गुपित सापडलं 'लहानपणापासूनच पुस्तक वाचून दाखवली तर मुलांची पुस्तकाशी नाळ जुळते. पुस्तक प्रकवाचन करून दाखवली,त्यातल्या गमतीजमती मुलांपर्यंत पोहोचवल्या की, त्यांना त्या आवडूला लागतात. केवळ मुलांच्या हातात पुस्तक देऊन आपलं काम संपणार नाही याची जाणीव मला एक गुरुजी म्हणून झाली. वाचनाच्या आनंदसोहळासोबतच.

शनिवार आमचा वाचनाचा,शिदोरी,अमृतकण,चला अमृतकण वाहू या,पुस्तकाभिशी,लेखक आमच्या भेटीला,पुस्तक परीक्षण,पुस्तक प्रदर्शन,पुस्तक पासबुक,बालसाहित्य कृतज्ञता पुरस्कार,लेखकाशी संवाद,शाळेसाठी आईचं दान असे उपक्रम माझ्या मदतीला आले.इतरही उपक्रम माझ्या मदतीला धावून आले...

मुलांना वाचनाकडे वळवताना हे सर्व उपक्रम मला वरदान ठरले.लेकरं पुस्तकाकडे वळली पाहिजेत.वाचती झाली पाहिजे यासाठी माझी धडपड आजही तितक्याच श्रद्धेने सुरू आहे.

मुलांना पुस्तकांकडे वळवताना महाराष्ट्रातील अनेक शब्दप्रभू माझ्या व माझ्या लेकरांच्या मदतीला धावून आले ज्यामध्ये रा रं बोराडे, सतीश काळसेकर,डॉ.आ ह साळुंखे, डॉ.संध्या पवार,गजानन थत्ते, बबन शिंदे,रवी राजमाने, भाऊ गावंडे,उत्तम सदाकाळ, शिवाजी देशमुख, प्रतिमा विश्वास, रेणू पाचपोर आबा महाजन,गुलाब बिसेन,पालीकचंद बिसने,नरेंद्रलांजेवार,विजया वाढ, एकनाथ आव्हाड,अमर हबीब,राजेश रेवले, आसाराम लोमटे, लीला शिंदे,माधव राजगुरू,प्रकाश बोकील, कल्पना दुधाळ, विद्याधर म्हैसकर, उत्तम कांबळे,बाबाराव मुसळे, पृथ्वीराज तौर,किरण केंद्रे,माणिक गेडाम,प्रमोदकुमार आनेराव, हेरंब कुलकर्णी, अशी कितीतरी साहित्यिक आमच्या शाळेच्या अंगणात मुलांसोबत खेळली,बागडली आणि आमच्या लेकरांच्या वाचनवेडात सहभागी झाली.....

**(युवराज माने जि प प्रा शाळा पारडी येथे उपक्रमशील शिक्षक आहेत.त्यांचे 'गुरुजी,तू मला आवडला' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.)**

**-७५१७४७८५७०**

# लांब मानेची जलचर कासवं



प्रा.डॉ.नंदा हरम
पुणे

महेश : आई,माझ्या डोक्यात थोडा गोंधळ निर्माण झाला आहे. पाण्यात सापडतात आणि जमिनीवर आढळतात,दोघांनाही आपण कासव म्हणतो,पण त्यात फरक आहे ना?

आई : अगदी खरं आहे बाळ! जे पाण्यात आढळतं (गोड्या आणि खाऱ्या) त्या कासवाला टर्टल म्हणतात. जे जमिनीवर आढळतं,त्याला टॉरटॉइज म्हणतात.जलचर कासवाचं कवच सपाट असतं,ते कासव सर्वभक्षक असतं,तर भूचर कासवाचं कवच गोलाकार असतं,ते शाकाहारी असतं.आणखीही खूप फरक आहेत.तुला का एवढी माहिती हवी आहे?

महेश : आई ऽऽऽ,मला लांब मान असलेल्या जलचर कासवांचं काही माहिती समजली आहे. ती तुला सांगायची आहे.

आई : मग,सांग ना ऐकायला आवडेल मला.

महेश : ऑस्ट्रोलियात सापडणाऱ्या या जलचरु कासवांना स्नेक-नेकड टर्टल किंवा इस्टर्न लॉग नेकड टर्टल म्हणतात.

आई : म्हणजे महेश,नावाप्रमाणेच यांची मान सापासारखी निमुळती आणि लांब असते का?

महेश : बरोबर ओळखलंस आई!

(आकृती १ पहा)




यांच्या पाठीवरचं कवच रुंद,सपाट,अंडाकृती असतं.वरील पृष्ठभाग फिकट तपकिरी किंवा काळपट असतो,तर खालचा भाग पिवळसर रंगाचा असतो.याचं डोकं,मान आणि पाय राखाडी किंवा तपकिरी रंगाचे असतात.

आई : महेश,एक विचारु का? त्यांची मान त्यांच्या कवचाच्या लांबीपेक्षा ही मोठी वाटतेय..?

महेश : खरं आहे तुझं निरीक्षण,आई! जगात साडणाऱ्या जलचर कासवांपैकी या कासवांच्या मानेची लांबी सर्वांत जास्त आहे ती इतकी जास्त असल्यामुळे पूर्णपणे कवचाखाली राहू शकत नाही.

आई : ही कासवं पुर्णवेळ पाण्यातच असतात का?

महेश : हो,त्यांना पाण्यातच जास्त आवडतं सहसा ते तळाशी आढळतात जेव्हा पाणी आटायला लागतं,तेव्हा ते सुप्तावस्थेत जातात.जंगलामध्ये जिथे पालापाचोळा असतो,तिथे जमिनीत स्वत:ला पाऊस येईपर्यंत पुरुन घेतात.

आई : या कासवाचं मुख्य अन्न जलचरच असतील ना?

महेश : हो मुख्यत्वे मासे.जेव्हा भक्षकांपासून लपून बसलेले असतात किंवा भक्ष्यकारीता टपून बसलेले असतात,तेव्हा मान आत दुमडून घेतात.

आई : अरे व्वा! मान लवचिक असते तर!

महेश : भक्ष्य जवळ आलं की, पटकन मान आणि डोकं

बाहेर काढतात. तोंड आणि जबडा असा उघडतात की एक प्रकारे पोकळी तयार होते त्यात पाणी आणि भक्ष्य तोंडात पटकन खेचलं जातं.कासव तोंड लगेचच बंद करतं नंतर जरासं तोंड उघडून पाणी बाहेर टाकलं जातं, पण भक्ष्याची मात्र सुटका होत नाही.

आई : महेश,कासवं अंडी घालतात ना!

महेश : हो या कासवांचा सप्टें-ऑक्टोंबर हा प्रजननाचा काळ असतो या काळात नर सक्रिय असतो. पाण्याध्येच नर-मादीचा संयोग होतो.

आई : मादी अंडी कधी घालतो?

महेश : वसंत ऋतुच्या अखेरीस किंवा उन्हाळाच्या सुरुवातीला घरट्याच्या हंगामाला सुरुवात होते. याकाळात मादी सक्रिय असते. घरट्याकरीता ती चांगल्या जागेच्या शोधात असते. पाण्याजवळ अंडी घालण्याकरीता ती जागा खणायला सुरुवात करते.वर्षाला ती ८ ते २४ अंडी घालते.अंडी उबवण्याचा कालावधी ४ ते ५ महिने असतो.

आई : हे कासव किती वर्ष जगतं!

महेश : साधारण ३० वर्षे !

आणि हो, आई, ही ऑस्ट्रोलियात सापडतात तशीच लांब मानेची पण वेगळ्या जातीची कासंव कॅनडाच्या दक्षिण-पुर्व भागात आणि अमेरीकेत सापडतात. त्यांना स्नॅपिंग टर्टलस् म्हणतात.

आई : म्हणजे हे कासव आवाज करतं का!

महेश : बरोबर ओळखलेस! उथळ पाण्यातं सहसा ते चिखलाखाली राहणं पसतं करतात.पाण्यात ते फारसे आक्रमक नसतात.जमिनीवर आल्यावर ते थोडा आक्रमक पवित्रा घेतात आणि आवाज ही करतात यांची पिल्लं जेव्हां घरट्यापासून बाहेर पडतात. तेव्हा ही तो आवाज करतात.प्रजननाच्या काळात नर आणि मादी एकमेकांना आकर्षित करण्यासाठी ही वेगवेगळे आवाज करतात.

आई : हे कासव ऑस्ट्रोलियन कासवासारखंच असतं की काही वेगळे असतं!

महेश : या कासवाच्या कवचाचे दोन भाग असतात.पाठीवरचं कवच बऱ्यापैकी सपाट,मागच्या बाजुला जास्त रुंद आणि मागच्या बाजुला त्यांना धारदार दातांसारखा भाग असतो

(आकृती क्र.२ पहा)



१. पृष्ठिय दृश्य

कवचावर वेगळीच खडबडीत रचना असते त्यामानाने खालचा भाग फारच लहान असतो.तो कवचाला दोन लांब अरुंद,पट्यांनी जोडलेला असतो.(आकृती पहा)

आई : खालचा भाग छोटा असल्यामुळे डोकं आणि पाय सहज फिरु शकतात. हो ना, महेश?

महेश : हो वाटतं खरं! तुला आधी सांगितलं ना,त्याप्रमाणे ते उथळ पाण्यात चिखलाखाली रहातात.आपली मान बाहेर काढून डोकं पाण्याच्या बाहेर काढतात,श्वास घेण्याकरीता,

आई : ही कासवं जलचरांना मटकावत असतील ना?

महेश : अगदी आनंदाने.त्यांच्या कचाट्यात सापडतील ते प्राणी मासे,बेडुक,छोटे साप,छोटी कासवं,पक्षी..काहीही वर्ज्य नाही.

आई : त्यांना दात असतात का?

महेश : नाही,त्यांना दात नसतात.त्यांचा जबडा अगदी धारदार असतो,तोच त्यांना उपयोगी पडतो.आणि आई...ते मांसाहारी असते तरी पाणवनस्पती ही भरपूर प्रमाणात खातात.

आई : त्यांचं भक्ष्य समजलं.पण ते कुणाच्या भक्ष्य स्थानी पडतात ?

महेश : ही कासवं जशी मोठी होतात,तसा त्यांचा धोका कमी होतो.पण त्यांची अंडी मात्र सहजच कावळे,स्कंक,कोल्टे,स्कून्स पळवतात.त्याचप्रमाणे अंड्यातून बाहेर आलेल्या पिल्लांनाही या प्राण्यांचा तसेच बगळा,ससाणा,घुबड,मोठे मासे,साप यांचा धोका

उदभवतो.एकूणच जगण्याचं प्रमाण कमी असतं.

आई : यांचा प्रजननाचा कोणता हंगाम!

महेश : हा काळ एप्रिल ते नोव्हेंबर असतो.पण जून जुलैमध्ये अंडी घातली जातात.वैशिष्टये म्हणजे मादी शुक्रजंतू कितीही काळ साठवून ठेवू शकते.गरज भासेल तेव्हांच ती वापरते अंडी घालण्याकरीता मादी वालुकामय मातीच्या शोधात बरंच अंतर कापते

आई : हे अंतर ती जमिनीवरुन कापते?

महेश : काही अंतर ती पाण्यातून ही जाते. वालुकामय मातीत खड्डा खणून मादी त्यात दरवर्षी २५ ते ८० अंडी घालते.मागच्या पायाच्या सहाय्याने ढकलत ती त्यांना घरट्यात घेवून जाते.(आकृती क्र.३ पहा)



अंड्यांवर वाळू पसरते.त्यात ती उबवली जातात आणि सुरक्षित राहतात.

आई : या अंड्यांचा उबवण्याचा कालावधी केवढा असतो?

महेश : हा कलावधी तापमानावर अवलंबून असतो.संशोधनात असं आढळून आलं आहे की जास्त तापमानाला ६३ दिवस लागतात तर कमी तापमानाला अंदाजे १४० दिवसांची गरज भासते.

आई : महेश,अमेरीकेत हिवाळ्यात तापमान खूप कमी होतं तेव्हा या कासवांचे हाल होत असतील ना?

महेश : हिवाळ्यात ते उथळ पाण्यात चिखलाखाली रहाण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या शरीराचं तापमान साधारण १ से.ग्रें.असतं पण जर तापमान त्यांच्याखाली उतरलं,तर बर्फ तयार होऊन या कासवांचा मृत्यू होतो.त्यांना जास्त हालचाल करता येत नाही.अमेरिकेच्या उत्तर भागात जिथे जास्त प्रमाणात बर्फ पडतो,तिथे कासव जिथे शीतनिद्रा घेतात,ती जागा बर्फाने आच्छादली जाते.त्यामुळे सहा महिन्यांहून अधिक काळ या कासवांना श्वासोच्छवासच घेता येत नाही. चिखलाबाहेर डोकं काढून तोंड आणि घशाच्या तत्वेतून वायूंची देवाणघेवाण होतो.जर पुरेसा प्राणवायू मिळाला नाही,तर शर्करा आणि मेद यांच्या ज्वलनाला सुरुवात होतो.विनॉक्सी मार्गाचा अवलंब केला जातो.

आई : बाप रे ! काय दयनीय अवस्था त्यांची!

ते असे हलू शकत नाहीत म्हणताना भक्षकांना त्यांची शिकार करणं सहज सुलभ होतं असेल.

महेश : खरं आहे तुझं म्हणणं! एका अभ्यासात दिसून आलं की ऊद मांजरांनी (ओटर्स) एका हिवाळ्यात सर्व स्नॅपिंग टर्टल्सचा खातमा केला.

आई : ही कासवं साधारण किती वर्षे जगतात?

महेश : अग,यांचं जीवनचक्र फार अनिश्चित आहे. अंडी आणि त्यातून बाहेर येणारी पिल्लं जगणं फार कठीण असतं,त्यांचं प्रमाण फक्त इजारोतून फार थोडी.त्यामुळे प्रौढ कासवांना त्यांच्या आयुष्यात खूप अंडी घालावी लागतात.

आई : पण एकदा का ते कासव जगलं आणि मोठं झालं,की ते भरपूर वर्षे जगत असले ना?

महेश : अगदी बरोबर साधारण ७५ वर्षांच्यावर त्यांचं आयुष्य असतं एकदा का ते मोठे झाले की त्यांचे नैसर्गिक भक्षक फार थोडे किंवा नसतातच,म्हण की!

आई : व्वा! आज कासवांची वेगळीच माहिती मिळावी.

महेश : आई,अजुन एक ! एक जाती आहे,ॲलिगेटर स्नॅपिंग टर्टल ही कासवांमधील सर्वांत मोठी जात आहे. हे गोड्या पाण्यातील वजनाने जड असलेलं कासव आहे. बाकी वर्णन करत नाही. पण एक वैशिष्टये सांगतो. त्यांच्या जीभेच्या टोकाला कृमीच्या आकाराचं लाल रंगाचं उपांग असतं (आकृती ४ पहा) त्यांची सारखी मागे-पुढे हालचाल होत असते.त्याच्याकडे मासे आकर्षित होतात.भक्ष्य थेट त्यांच्या तोंडातच प्रवेश करते.

आई : जीवसृष्टीत किती वैविध्य आहे. ना,महेश ! पण चल थांबूया आता काम वाट बघताहेत माझी....

-९३७२९१०३२६

# प्रवास प्राचार्य पदापर्यंतचा!



गोविंद गांगुर्डे
दोंडाईचा-धुळे

धुळे जिल्हा व परिसरात नावारूपास आलेल्या हस्ती वर्ल्ड स्कूल या सी.बी.एस. ई.पॅटर्न शाळेच्या प्राचार्य पदापर्यंत कसा पोहोचलो याचा विचार जेव्हा करतो,तेव्हा मला तर सुरुवातीला स्वप्नवतच वाटते. कारण विज्ञान शाखेतून शिक्षण घेऊन मोठ्या कंपनीत उच्च पदावर विराजमान होण्याची इच्छा होती. त्याकरीता अकरावी विज्ञान शाखेत कर्म. आनंदराव माणिकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर येथे मनातल्या इच्छेनुसार प्रवेश घेतला होता.

पण इच्छा आणि आवड या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. आवड साहित्य वाचनाची होती. म्हणून अकरावी विज्ञान शाखेत सुरुवातीचे तीन महिने शिक्षण घेऊन पुन्हा आवडीच्या क्षेत्राकडे म्हणजे कला शाखेत प्रवेश वर्ग केला. कला शाखेतून आपल्याला भवितव्य मिळेल या शक्यतेच्या गोष्टीवर विश्वास ठेवून बारावीनंतर बी.ए.साठी स्पेशल इंग्रजी हा विषय घेऊन पदवीपर्यंतचे शिक्षण नंदुरबार येथील जी टी पी महाविद्यालयात पूर्ण केले. पदवीला इंग्रजी स्पेशल विषयासोबत वाचनाच्या सवयीमुळे ऑप्शनला इतिहास व मराठी हे विषय घेऊन पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

२००० साली जी टी पी महाविद्यालयातच इंग्रजी विषयात एम. ए. पूर्ण केले. २००१ या वर्षात बी. एड. पूर्ण झाल्यावर मध्यप्रदेशातील सेंधवा येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत रुजू झालो. मात्र आपल्या महाराष्ट्रातही अनेक चांगल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपण आपल्या गावाकडे नोकरी करायला हवी असे मनोमन वाटू लागले. मग नवापूर येथील आय एम दिवाण इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सेंधवा येथील एका वर्षाच्या अनुभवावर नोकरी मिळवली. तेथे चार वर्षे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून काम केले. तेथे नोकरी करत असतानाच आपण पदवी शिक्षण घेतलेल्या आवडीच्या विषयात एम. ए. करावे असे वाटले. मात्र नोकरी करत असताना हे शक्य वाटत नव्हते. कारण एम.ए. ला नियमित महाविद्यालयात जायचे म्हटल्यावर नोकरी सोडावी लागणार होती. मात्र पुणे येथे विद्यापीठात बहिस्थ मराठी विषयाचे एम. ए. असल्याने तेथे प्रवेश घेऊन नोकरी करत असतांना मी एम. ए. पूर्ण केले. मराठी विषया नंतर इतिहास विषयातही एम. ए. नवापूरला असतांनाच पूर्ण केले.

२००७ ला वर्तमानपत्रात धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथील नावलौकिकास पात्र हस्ती पब्लिक स्कूलची इंग्रजी विषयाची जागा असल्याची जाहिरात वाचली. मग मी दोंडाईचा येथील हस्ती स्कुलला सेवेची संधी मिळेल, या आशेने मुलाखत दिली. मुलाखत यशस्वी झाल्यावर सलग आठ वर्षे इंग्रजी आणि सोशल सायन्स हे विषय शिकवण्याची भाग्य मला नावाजलेल्या शाळेत लाभले.

सहाय्यक शिक्षक म्हणून सेवा देत असतानाच शासनाने २०१४ या वर्षी पहिल्यांदाच शिक्षक पात्रता परीक्षा घेतली. ही परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पास झालो. नंतर केंद्रशासनाची सीटीईटी ही परीक्षाही मी पात्र झालो. तसेच स्कूल मॅनेजमेंटचा डिप्लोमा कोर्सही यशस्वीरित्या पूर्ण केला.


दोंडाईचा येथील हस्ती पब्लिक स्कूल येथे सलग आठ वर्षे नोकरी केल्यावर मध्यंतरी २०१५ते २०२१ हे सहा वर्षे नंदुरबार येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलला नोकरी केली. सहा पैकी तीन वर्ष उपप्राचार्य पदी माझी नेमणूक करण्यात आली होती.

२०२१ या वर्षापासून हस्ती वर्ल्ड स्कूल येथे मागील एक वर्षापासून प्राचार्य म्हणून काम पाहत आहे. आयुष्यात एखाद्या मोठ्या कंपनीत नोकरी करण्याची इच्छा होती. मात्र आवडलेल्या क्षेत्रातून शिक्षण पूर्ण करून ज्ञानदानाचे कार्य करत असताना २० वर्षांच्या अविरत सेवेनंतर प्राचार्यपदी पोहोचलो याचा मनस्वी आनंद आहे.

-८०८०७३१४३२

## स्वरचित

**योग दिनानिमित्त आयोजित चारोळी लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळालेल्या मा.उज्वला पाटील यांच्या स्वरचित चारोळ्या....**



ऋषी मुनींनी दिलेले आहेत
आम्हा अनमोल योगाचे धडे,
त्याचे अनुकरण करता रोज
निरोगी स्वास्थ्य आपले घडे

योग प्राणायाम व्यायाम सुत्रे
भारतीय संस्कृतीचा आदर्श ठेवा,
ज्याच्या संपूर्ण विश्वाला वाटतोय
आपल्या भारताचा खरोखर हेवा.

शरीर मन बुध्दीला खरंतर
आंतबाह्य शिस्त लावतो योग
सर्वांग नेहमी पुलकित करतो
खुपच सुंदर अभिनव प्रयोग

कामात कितीही असू आपण व्यस्त
योग प्राणायाम ठेवेल बघा खरं मस्त

चला चला आपण योग करूया
जीवनातून आळस दूर सारुया

**उज्वला देविदास पाटील**
आर.सी.पटेल प्राथमिक शाळा,शिरपूर जि.धुळे
-९८२२६४७७१५

माझी शाळा उपक्रमशील शाळा

# गुणवत्तेकडून शाळा विकासाकडे




**मैसनवाड पेंटू**

परतूर-जालना


आई ही मुलांची शाळा असते आणि शाळा ही समाजाची आई असते.जर का मुलाला त्यात जन्मजात असणाऱ्या (wonder) आश्चर्य या सेन्सला जिवंत ठेवायचं असेल तर त्याला एक साथीदार हवा असतो,ज्याच्यासोबत तो नव-नवीन शोधाचा आनंद,जगात असणाऱ्या रहस्याचा उलगडा आणि उत्साह याची देवाणघेवाण करू शकेल आणि हा शिक्षण साथी त्याला जर शाळेत शिक्षकाच्या स्वरूपात मिळाला तर तो मनात येईल ते एक्सपरिमेंट्स करून बघेल. शोध घेईल जगाच्या रहस्याच्या, आणि त्याला पडणाऱ्या प्रश्नांचा.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे एकमेव उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून प्रत्येक शाळा आपल्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाचा आराखडा आखत असते . ही आवडते मज मनापासुनी शाळा। लाविते लळा जसा माऊली बाळा।। जर बालकाला शाळा आवडू लागली, तर तिच्या विषयी लळा निर्माण होऊन ती माझी आहे असे मनी ठसते. त्यासाठीच प्रत्येक शाळा आपल्या शाळेत विविध उपक्रम राबवत असते. असेच काही आमच्या शाळेतील उपक्रम-

**ज्ञानरचनावाद:-** शिक्षण ही एक आतून तयार होणारी प्रक्रिया आहे.जी आश्चर्य ,निरीक्षण, कल्पकता यावर आधारित आहे.आपण कुणालाच काही शिकवू शकत नाही. आपण त्यांना फक्त विचार करायला भाग पडू शकतो. अनुभव हा सर्वात मोठा शिक्षक असतो,असे स्वामी विवेकानंद म्हणतात. मग शिक्षक म्हणून मी मुलाच्या आयुष्यात कोणती महत्वाची भूमिका निभावतो? हा प्रश्न पडला. नेमकं शिक्षण म्हणजे काय तर जे विचार करायला शिकवत ते.आणि हळूच उत्तर मिळाले की, मी हे अनुभव आणि विचार करायला भाग पाडणारी



क्रिया मुलांसोबत कशा पद्धतीने करू शकतो.तेथून ज्ञानरचनावाद उलगडला आणि त्याच्या जन्माचं बीज हे curiosity होते म्हणून त्याच्यावर जास्त लक्ष दिले.भाषिक कौशल्य व मूलभूत क्रिया यावर आधारित भाषा, गणित आणि इंग्रजी पेटीतील साहित्याचा वापर करून स्वयं अध्ययन करून शिकणे यावर अधिक भर आहे .तसेच वर्गात स्टँड व ट्रे च्या आधारे साहित्याची मांडणी केली. वर्गातील भिंती बोलक्या केल्या. लोकसहभागातून शाळेची रंगरंगोटी केली, त्यात वारली पेंटिंग सर्वांचे लक्ष वेधून घेते .विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील संकल्पना चित्रात उतरल्या गेल्याने शिकणे अगदी सोपे झाले. मूल आणि शिक्षक जणू एकाच विश्वाचा भाग आहे

अशी जाणीव होऊ देणार structure तयार केलं. स्टँड व ट्रे वरील साहित्य सहज घेता येईल अशी रचना केलेली आहे. भाषा विकासासाठी श्रवण ,भाषण, वाचन व लेखन असे टप्पे प्रत्येक विद्यार्थ्यांचे घेण्यात आलेले आहेत. तसेच त्याला पूरक म्हणून चार प्रकारे अक्षर गट पुस्तकांचा वापर करण्यात येतो. प्रत्येक मूल स्वतःहून शिकत व इतर मुलांनाही शिकवत व ज्या ठिकाणी अडचण आली त्या ठिकाणी शिक्षकांचे मार्गदर्शन घेतो आणि संवाद साधतो. हे करत असताना तो गांभीर्याने निर्णय (क्रिटिकल थिंकिंग) घेतो.

**विषय मित्र पद्धतः-** कुणा एकाच्या संकल्पनेवर एकटं काम करणे, त्यातून यश हे हळू मिळतं;पण त्याच संकल्पनेवर उर्वरित लोकही त्याच उत्साहाने काम करतील ते जलद गतीने आणि मोठ्या स्तरावर होतं, म्हणून वर्गातली मुलेच एकमेकांचे शिक्षा साथी तयार केले.आता ही प्रक्रिया Resonance आणि ripple effect आणणारी होती.सर्वांचे विचार आणि frequency त्या संकल्पनेची कामाला लागले आणि त्याला मूर्त स्वरूप मिळाले 'गल्ली मित्राच्या' स्वरूपात.औपचारिक पद्धतीपेक्षा अनौपचारिक पद्धतीने एखादी गोष्ट अधिक चांगल्या प्रकारे समजली जाते. याचा आधार घेऊन एखादा विषय मित्राकडून समजून घेतला जाऊ शकतो ही संकल्पना पुढे आली व तयार झाले 'विषय मित्र'. ज्या विद्यार्थ्यांचा अभ्यास पूर्ण झालेला आहे असा कोणताही विद्यार्थी विषय मित्र असू शकतो. आपल्या गल्लीतील विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्यासाठी गल्ली मित्र निर्माण केले .ज्या ठिकाणी गल्ली मित्र व विषय मित्र उपलब्ध होणे शक्य नाही अशा व इतरही ठिकाणी पालकांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी दूर करण्यासाठी गावातील सुशिक्षित पालक मित्र तयार झाले. शाळेत व शाळेबाहेर विद्यार्थ्यांचे गट तयार करून गटागटात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरू झाली. ही ग्रुप लर्निंग पद्धत कोविड काळात अतिशय उपयुक्त ठरली. सहज खेळता खेळता शिक्षण व्हावे या संकल्पनेतून गल्ली मित्र तयार झाले .शाळा सुटल्यानंतर त्याच गल्लीतील राहणाऱ्या विद्यार्थी आपला अभ्यास या संकल्पनेत घेत असतो. कोरोना काळात विद्यार्थ्यांना गाणी, गोष्टी ,पाढे घरी राहून शिकता आले. शिक्षकांची भूमिका फक्त सुलभकाची राहील .समवयस्क गटातील विद्यार्थ्यांनी जर एखादी गोष्ट समजावून सांगितली तर ती अधिक चांगल्या प्रकारे व सहजतेने समजत असते .नेमके तेच विषय मित्र व गल्ली मित्र यांच्या माध्यमातून होत असते आणि शिक्षण सोपे होते.विषय मित्राचा रोल करतेवेळी तो सहजरित्या सहयोग करतो(collaboration).हवा तिथे साहस दाखवतो,जाणीव (consciousness)ठेवतो की माझ्या मित्राला कोणत्या भाषेत/पद्धतीने कळेल.

**टॅबयुक्त शाळा :-** पुस्तक आणि technology यांची स्वतःची वेगळी ओळख असली तरी , जगाच्या स्पीड ने चालायला खेड्यातील मुलांनी मागे पडू नये म्हणून विज्ञानाने दिलेलं JIO- 4g च्या गिफ्टचा खूप फायदा झाला.कोविड काळात ऑनलाईन शिक्षण पद्धती पुढे आली व त्याची संकल्पना उदयास आली. लोकसहभागातून शंभर टक्के(१००%) मुलांना देण्यात आलेतसेच डोंगलमुळे नेटवरची ही अडचण दूर झाली .दृकश्राव्य व मनोरंजक पद्धतीने टॅबची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देऊ लागली . युट्यूब, दीक्षा,बोलो,रिड टू मी , शिकू आनंदे इत्यादी अनेक ॲप विद्यार्थी सहजतेने हाताळू लागले. विद्यार्थी व पालक यांचा समन्वय राखण्यासाठी उपयुक्त ठरली ती मेंदू विकास कार्यशाळा .यात मेंदूचा विकास कसा होतो, त्याचे टप्पे, पालकांचा सहभाग व समुपदेशन, सापशिडी ,विविध खेळ इत्यादी घटकांचा समावेश होता. प्रत्येक विद्यार्थ्यांना टॅब प्राप्त झाल्याने ऑनलाईन शिक्षणाची अडचण दूर झाली तसेच इंग्रजी विषयाची भीती दूर करण्यासाठी 'लिप फॉर वर्ड' हा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विविध व्हिडिओद्वारे अक्षरांचे उच्चार, शब्दांचे उच्चार ,वाक्य निर्मिती ,जलद वाचन इत्यादी अगदी सहज सोप्या पद्धतीने शिकवण्यात येते. इंग्रजी समजण्यास व वाचण्यास सोपे झाले. या उपक्रमामुळे आमच्या शाळेतील शंभर टक्के विद्यार्थी इंग्रजी वाचन करतात .पाठ्यपुस्तक व इतर

ॲक्टिव्हिटी ते सहजपणे पूर्ण करतात.टॅब चा वापर त्यांच्या कुतुहलातून (curiosity)निर्माण होणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देतो.त्यातील अँप्लिकेशन मुले लेर्ाीपिळलरींळेप साठी मुलांना शब्दसाठा मिळतो,त्यांची लिस्टनिंग सतत सुरू असल्याने योग्य उच्चराचे शब्द कानी पडतात.

**माझी वसुंधरा व ग्रीन गार्डन रूम:**–जिथे स्वछ,आनंदी मोकळं रान असते तिथे बीज अंकुरित होते, बहरते आणि मोठे होते. हेच मुलाच्या वाढीच्या पोषकत्वाला लागू होते. मुले अवतिभवतीच्या भौतिक जगाचा, पर्यवारणाचा,घटनांचा स्वनिर्मित अर्थ लावण्याचा खटाटोप करतात. मुक्तोत्तरी प्रश्न आणि अनअपेक्षित प्रश्न याचे उत्तर शोधत असतात. निसर्गाच्या सानिध्यात अगदी सहजतेने शिक्षण होऊ शकते. त्यासाठी शालेय परिसरात विविध प्रकारची दीड हजार वृक्ष लावण्यात आली. यामुळे शाळेच्या सौंदर्यात भर पडली आहे. त्याचबरोबर यातून भविष्यात दरवर्षी कमीत कमी एक लाख रुपयांचे उत्पन्नही मिळणार आहे. लावलेल्या दीड हजार झाडांभोवती ग्रीन कापड लावून ग्रीन गार्डन रूम तयार करण्यात आली. यात बेंच व चटईची व्यवस्था केल्याने विद्यार्थी या ठिकाणी प्रसन्न वातावरणात लर्निंग करू शकत आहेत. शिक्षण आनंददायी व उत्साही वातावरणात होण्यासाठी ग्रीन गार्डन ची खूप मदत झाली आहे. पियर लर्निंग व ग्रुप लार्निंग मुळे एकमेकांच्या मदतीने शिक्षण पूर्ण होऊ लागले व त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वृत्तीही वाढीस लागली .हसत खेळत बागडत शिक्षण मिळत असल्याने विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण खूप कमी झालेले आहे. विद्यार्थी व पालकांना शाळेविषयी आपुलकी निर्माण होण्यास मदत झाली .घरी ज्याप्रमाणे विद्यार्थी मुक्तपणे विहार करत असतात, तेच वातावरण जर शाळेत मिळत असेल तर ती शाळा मुलांना नक्कीच आवडते.

**परसबाग व फ्लावर पार्क:**– विद्यार्थ्यांना पोषक व सकस आहार मिळावा यासाठी शालेय पोषण आहार अंतर्गत फळे व पालेभाज्यांचा वापर आपण करत असतो. जर या पालेभाज्या आपल्या शाळेच्या परसबागेत उपलब्ध होत असतील तर ते विद्यार्थ्यांपर्यंत सहज पोहोचतील व आहारातही त्याचा नियमित वापर होईल. पालेभाज्या लागवड करताना त्या सेंद्रिय असतील यावर अधिक भर देण्यात आला आहे. तसेच शाळेच्या प्रांगणात झेंडू ,तुळस ,सदाफुली, गुलाब इत्यादी फुलझाडांचे पार्क आपले जणू स्वागतच करते .परस बागेचे जतन करण्यासाठी शिक्षकां सोबत पालकांचेही मोलाचे योगदान आहे .परिसर अभ्यास हा घटक वर्गात चार भिंतीत राहून न शिकता प्रत्यक्ष त्या वस्तूच्या ठिकाणी जाऊन शिकवणे यात खूप मोठा आनंद विद्यार्थ्यांना मिळत असतो. तसेच या विषयाचे आकलन व दृढीकरण खूप चांगल्या प्रकारे होत असते .आमच्या परसबागेत मिरची ,पालक ,मुळा, कोथिंबीर, पानकोबी ,फुलकोबी ,टमाटर, शेवगा व इतरही पालेभाज्या मिळतात. सदरील परसबागेसाठी शाळेच्या आवारातील तीन गुंठे जमीन शाळेसाठी प्राप्त करून घेतली. ही परसबाग विद्यार्थ्यांकडून, विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यां मार्फ़त चालवली जाते.वृक्षारोपण



आणि त्याची निगा राखणे ,ही प्रक्रिया पर्यावरणाविषयी सहानुभूती(compassion) मुलांमध्ये तयार करते.

**तारेवरचे वाचनालय:**-विचार हे बीज बनतात आणि तेच कृतीत उतरतात. उद्याच्या समाजाला ते जन्म देतात. म्हणून या चिमुकल्या मनाला आणि डोक्याला योग्य खाद्य देणे गरजेचे वाटले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी एक हजार पुस्तके शासन स्तरावर उपलब्ध झालेली आहेत. शाळास्तरावर शिक्षकांनीही काही पुस्तके विकत आणली, त्यामुळे पाठ्यपुस्तकाशिवाय गाणी ,गोष्टी रंगीबिरंगी चित्रांची पुस्तके ग्रीन गार्डन रूम मध्ये तारेवरच सहज उपलब्ध होतात. जालना एज्युकेशन फाउंडेशनची वर्कबुक कोरोना काळात विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त ठरली. आपल्या आवडीचे पुस्तक निसर्गाच्या सानिध्यात, पक्ष्यांच्या किलबिलाटात वाचायला मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नाही आणि त्यातच आनंददायी शिक्षण हे उद्दिष्ट पूर्ण होते.तारेवरच्या मुक्त वाचनालयात विद्यार्थ्यांच्या भविष्यातील पुस्तके असल्याने त्यांना समजपूर्वक वाचन करणे सुलभ जाते. हे वाचनालय विद्यार्थ्यांच्या भाषणात भर टाकते. तसेच ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी हातभार लावते. कोरोना काळात जालना एज्युकेशन फाउंडेशनचे वर्कबुक मिळाले व त्याचा वापर आजही विद्यार्थी अतिशय आवडीने करत आहेत .पुस्तक वाचनाने मूल नवीन ज्ञान प्राप्त करून समीक्षक बनतात( criticism).त्यांना प्रश्न पडतात,ते analyse करतात.शिक्षण म्हणजे काय,तर शाळा सोडल्यानंतर त्याला विविध गोष्टींचा विसर पडून, त्याच्या जे लक्षात राहून जात ते.-lbert Einstein.शिक्षण हे तुकड्या तुकड्यात देण्याची क्रिया नसून ते हे Holistically होत जातं . म्हणून हा इंटिग्रेटेड अँप्रौच तयार केला ज्यातून ते विविध विषय कृतीतून शिकतील. अनुभव तयार करणं हे शिक्षकाच creative ड्युटी झालेली आहे. कारण माहितीचा भांडार आज इंटरनेट सहजरित्या देत.त्याच्यापालिकडली मदत आज मुलांना अपेक्षित आहे.असा हा शिकण्यासाठी स्वतंत्र मैदान तयार करून देण्याचा एक छोटासा प्रयत्न मुले आणि शिक्षक मिळून केला गेला.

**(मैसनवाड पेंटू हे प्रा.शा.दहिफळ भों.पूर्व ता.परतूर जि.जालना येथे कार्यरत आहेत.)**

**-८९९९२६००२१**

# शैक्षणिक बातम्या

## विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट शहर लंडन

विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट शहराची यादी क्युएस ने जाहीर केली आहे.लंडन हे जगातील विद्यार्थ्यांसाठीचे सर्वोत्कृष्ट असल्याचे या यादीतून दिसून येत आहे.परदेशातील विद्यार्थ्यांनाही लंडनमध्ये किफायतशीर आणि चांगले शिक्षण मिळत असुन विद्यार्थ्यांसाठी चांगल्या सुविधा विद्यापीठांचा दर्जा याबाबतीत लंडन सरस असल्याचे या यादीत म्हटले आहे. भारतातील विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट शहर मुंबई असल्याचेही क्यूएस ने म्हटले आहे.यूएस विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट शदर यादी दरवर्षी जाहीर केली जाते.यंदा २०२३ साठीची यादी जाहीर करण्यात आली आहे. लंडननंतर विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट शहर दक्षिण कोरियातील सेऊल आणि जर्मनीमधील म्युनिच ही शहरे आहेत. चौथ्या क्रमांकावर मेलबर्न ही शहरे आहेत. मुंबई या यादीत १०३ व्या क्रमाकांवर असली तरी भारतात विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शहर मुंबई असल्याचे या यादीत म्हटले आहे. मुंबईत किफायतशीर शिक्षण मिळत असले तरी विद्यार्थ्यांना आपले शैक्षणिक स्वप्न पुर्ण करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो, असे नमुद करण्यात आले आहे. या यादीत बंगळूरू ११४ व्या, चेन्नई १२५ व्या आणि दिल्ली १२९ व्या क्रमांकावर आहे.किफायतशीर शिक्षण, गुणवत्ता, विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांचा दर्जा, शैक्षणिक व विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सुविधा आणि या शहरांतून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांची ते यांच्या आधारावर ही यादी तयार केली जाते.

## ऑनलाईन परीक्षांसाठी सुसज्ज परीक्षा केंद्रे

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाकडून (एनटीए) देशभरात संगणकावर आधारित परिक्षांसाठीची परीक्षा केंद्रे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. देशभरातील सहाशे जिल्ह्यांमध्ये मिळून सत्रनिहाय दोन परीक्षेसाठी किमान अडीचशे विद्यार्थ्यांची सोय होऊ शकणारी परीक्षा केंद्रे तयार केली जाणार असून,इच्छुक संस्थांबरोबर भागीदारी करणेही शक्य असल्याचे एनटीएकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

एनटीएकडून सध्या प्रवेश परीक्षा,भरती परीक्षा आणि पात्रता परीक्षा घेतल्या जातात. काळानुरुप नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मूल्यमापन पध्दतीचे नवे मार्ग विकसित करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने एनटीवर जबाबदारी सोपवली आहे. या अंतर्गत देशभरात संगणकावर आधारित परीक्षा केंद्रे उभारण्याच्या प्रकल्प आहे. त्यासाठी देशभरात परीक्षा केंद्रांच्या उभारणीसाठी एनटीएने देशभरातील विद्यापीठांकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती मागवली आहे.परीक्षा केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना एनटीएकडून विकसित केल्या जाणाऱ्या डेटा ऑनोटेशन, इमेज क्लासिफिकेशन, स्पीच ट्रानस्क्रिप्शन अशा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुविधांचा वापर करता येईल. संबंधित परीक्षा केंद्राचा उपयोग राष्ट्रीय शैक्षणिक धोरण२०२० मध्ये नमूद केलेले माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रम राबवण्यासाठीही केला जाऊ शकतो.या परीक्षा केंद्रांद्वारे अधिप्रमाणित माहिती तंत्रज्ञानावर आधारित परीक्षा केंद्रांची सुविधा निर्माण होईल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी या परीक्षा केंद्रांचा वापर व्हर्च्युअल प्रयोगशाळा म्हणूनही करणे शक्य आहे, असे एनटीएने स्पष्ट केले आहे.

## राज्यात ५४५ शाळांमध्ये अटल टिंकरिंग

शालेय जीवनापासूनच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, अभियंत्याप्रमाणे संकल्पना व गणितीय सुत्राधारित विचारशैली (स्टेम) विकसित करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाविषयीची भिती घालवण्याच्या उद्देशाने केंद्राच्या निती आयोगा अंतर्गत अटल टिंकरिंग प्रयोगशाळा सुरु करण्यात येत आहेत.राज्यात ५४५ शाळांमध्ये या टिंकरिंग प्रयोगशाळांना मान्यता मिळालेली आहे. देशात सहा हजार ३७ अटल प्रयोगशाळांना मान्यता मिळालेली असून यामधील संख्येत महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. सर्वाधिक उत्तरप्रदेश (७२९) तर त्या खालोखाल तामिळनाडू (७६१) व कर्नाटकला (५७९) प्रयोगशाळा मिळालेल्या आहेत.

राज्यासाठी मंजूर झालेल्या ५४५ प्रयोगशाळांच्या संख्येपैकी निम्यापर्यंत पुणे (३६), कोल्हापूर (६५), सांगली (४५), सातारा (४१), सोलापूर (१८) व अहमदनगर (४६) या जिल्ह्यांमध्ये आहेत. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यापैकी सर्वाधिक बीड (३६) जिल्ह्यात आहेत. त्या खालोखाल लातूर (२३), औरंगाबाद (९), जालना व नांदेड प्रत्येकी (४), परभणी ६, उस्मानाबाद ५ तर हिंगोलीला २ प्रयोगशाळा मंजूर झाल्या आहेत. पूर्व व पश्चिम विदर्भाला एकूण ९१ तर कोकणातील तीन जिल्ह्यांमध्ये २२, नाशिक (३४), जळगांव (८), धुळे (५), नंदुरबार (४), मुंबई शहर (९), उपनगर (६), ठाणे (१२) जिल्ह्याला प्रयोगशाळा मिळाल्या आहेत. या प्रयोगशाळांमधून त्रिमितीय छपाई, कृत्रिम प्रज्ञातंत्रज्ञान (आर्टिफिशल इंटेलिजन्स), रोबोटिक, विज्ञानाधारित नवतंत्रज्ञानाशी विद्यार्थ्यांना अवगत करणे. स्टेम अर्थात सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरींग व मॅथ्सच्या माध्यमातून नवउद्दमी, कौशल्यज्ञान विकसित करण्याचा उद्देश आहे. जपानमधील मुलांप्रमाणे स्वनिर्मित वस्तूंचा विचार रुजवण्यासाठी अटल टिंकरिंग प्रयोगशाळांचा उपयोग होणार आहे.

शिक्षणयात्री

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

**संपर्क** :शिक्षणयात्री शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे 8208301001shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23










## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका
शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

**With pay any app**

Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

प्रती, ................................................
................................................
................................................

Pragati Arts Shirpur 8421356261